मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३१९ ■ शनिवार, ०१ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## वर्षावास निमित्त धम्म बांधवांची गृह भेट उपक्रम



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दिनांक २९ जुलै २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने वर्षावास (आषाढी पौर्णिमा) निमित्त धम्म बांधवांची गृह भेट हा उपक्रम उत्साहात पार पडला. तथागत बुद्धांच्या पहिल्या उपदेश दिनानिमित्त (धम्मचक्क पवत्तन सुत्त) आयोजित या कार्यक्रमास धम्म बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळाचे सचिव आयु. मुकुंद रोटे व त्यांच्या परिवाराच्या निवासस्थानी, खादा कॉलनी, पनवेल येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित बांधवांच्या स्वागताने झाली. त्यानंतर कुटुंबाचा परिचय करून देण्यात आला.

कार्यक्रमात बुद्ध वंदना घेण्यात आली आणि उपस्थितांनी धम्माचे विचार आत्मसात करण्याचा संकल्प व्यक्त केला. शेवटी उपस्थितांसाठी खीर व अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून धम्म बंधुत्व वृद्धिंगत करण्यासह सामाजिक एकात्मता मजबूत करण्याचा संदेश देण्यात आला. वर्षावास दरम्यान मंडळाच्या वतीने अशा प्रकारचे उपक्रम दर रविवारी सकाळी १० ते ११ यावेळात राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

# राज्यातील सागरी पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी मंत्री नितेश राणे यांची जेएनपीएला भेट

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्राचा सर्वांगीण आणि दीर्घकालीन विकास साधण्यासाठी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री श्री. नितेश राणे यांनी आज उरण येथील जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाच्या (JNPA) मुख्य प्रशासकीय भवनाला भेट देऊन बंदरातील विविध विकासकामांचा तसेच भविष्यातील विस्तार आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला. आणि वाढवण बंदर प्रकल्पासह विविध विषयांवर सकारात्मक चर्चा केली. यावेळी जेएनपीएचे अध्यक्ष श्री. गौरव दयाळ, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पी. प्रदीप, जेएनपीएच्या सचिव तथा महाव्यवस्थापक श्रीमती मनीषा जाधव तसेच जेएनपीए आणि महाराष्ट्र सागरी मंडळातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जेएनपीएची विद्यमान





बंदर क्षमता, मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी, आधुनिक पायाभूत सुविधा, कंटेनर हाताळणी क्षमता वाढविण्यासाठी सुरू असलेली कामे तसेच पर्यावरणपूरक व्यवस्थापनाच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा मंत्री श्री. राणे यांनी सविस्तर आढावा घेतला. तसेच, जेएनपीएमार्फत आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांबाबतही चर्चा करण्यात आली.यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त सहभागातून पालघर जिल्ह्यात विकसित होत असलेल्या महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाच्या आराखड्याचाही मंत्री श्री. राणे यांनी सविस्तर आढावा घेतला. राज्यातील बंदरांची क्षमता वाढविणे, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणे, मल्टीमोडल लॉजिस्टिक नेटवर्क अधिक सक्षम करणे तसेच महाराष्ट्राला जागतिक सागरी व्यापाराचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सकारात्मक चर्चा झाली प्रसंगी मंत्री श्री. नितेश राणे यांनी महाराष्ट्राच्या सागरी विकासाला अधिक गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून विविध विकास प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला. तसेच, बंदर क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कौशल्य विकासाला चालना आणि जागतिक दर्जाच्या सुविधा उभारण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता त्यांनी सांगितले.यावेळी मंत्री श्री. नितेश राणे यांनी महाराष्ट्राच्या सागरी विकासाला अधिक गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून विविध विकास प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला. तसेच, बंदर क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कौशल्य विकासाला चालना आणि जागतिक दर्जाच्या सुविधा उभारण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता त्यांनी सांगितले.

# वरळी बीडीडी चाळ प्रश्नांवर सचिन अहिर यांच्यासोबत सकारात्मक बैठक

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभागीय संपादक** : मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी दुपारी विधानभवन येथे महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती तथा आमदार ना. श्री. सचिनभाऊ अहिर यांची त्रिक्षेत्र विकास मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांनी सदिच्छा भेट घेत विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी मंडळाच्या वतीने वरळी बीडीडी चाळ परिसर, डिलाईड रोड तसेच भोईवाडा परिसरातील बैठ्या घरांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या समस्या उपसभापतींसमोर मांडण्यात आल्या.

बैठकीदरम्यान परिसरातील पुनर्विकास, रहिवाशांच्या मूलभूत सुविधा, घरांच्या अडचणी, विविध प्रशासकीय प्रलंबित बाबी तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या अडचणी तातडीने मार्गी लागाव्यात, यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी मंडळाच्या प्रतिनिधींनी केली.





यावेळी उपसभापती ना. सचिनभाऊ अहिर यांनी मंडळाच्या प्रतिनिधींचे म्हणणे संयमाने ऐकून घेत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. तसेच पुढील आठवड्यात म्हाडाचे अधिकारी श्री. जयस्वाल यांच्यासोबत विशेष बैठक आयोजित करून संबंधित प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल आणि शक्य तितक्या लवकर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या या भूमिकेमुळे उपस्थित पदाधिकारी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

या बैठकीस त्रिक्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. राज जाधव, खजिनदार श्री. संतोष मते, श्री. दिलीप जाधव तसेच मंडळाचे महिला व पुरुष पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी मंडळाच्या वतीने उपसभापती ना. सचिनभाऊ अहिर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या बैठकीमुळे वरळी बीडीडी चाळ, डिलाईड रोड आणि भोईवाडा परिसरातील बैठ्या घरांच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली असून, शासन स्तरावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली.

# व्यावसायिक शिक्षणासाठी शिक्षकांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), नाशिक तसेच पंचायत समिती शिक्षण विभाग, निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय शासकीय तालुकास्तरीय व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता कार्यशाळा विझ्डम इंटरनॅशनल स्कूल व अचिव्हर्स ज्युनिअर कॉलेज, निफाड येथे उत्साहात पार पडली.

विद्यार्थ्यांमध्ये उद्योगशीलता, कौशल्याधारित शिक्षण आणि स्वावलंबी विचारसरणी विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेत तालुक्यातील शिक्षक व मुख्याध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. एकूण १७० प्रशिक्षणार्थींनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

कार्यशाळेदरम्यान इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, उद्योजकता विकास,



कौशल्याधारित शिक्षणाची आवश्यकता तसेच रोजगाराभिमुख शिक्षणाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योग-व्यवसायाची आवड निर्माण करून त्यांना भविष्यात स्वावलंबी बनविण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

प्रत्येक शाळेत व्यावसायिक शिक्षण समिती स्थापन करून समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष सुरू करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवडीनिवडी आणि स्थानिक रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन त्यांना योग्य दिशा देण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेस निफाडचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, प्रशिक्षण प्रमुख तथा विस्ताराधिकारी लता भरसट, विजय खालकर, आत्माराम न्याहारकर व प्रमोद चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुलभक म्हणून पंकज गांगुर्डे, रमेश गुरगुडे आणि अभयसिंग महाले यांनी प्रभावीपणे कामकाज सांभाळले.यावेळी मुख्याध्यापक संजय दिघे, गुलाब टकले, एन. सी. वाळके, राहुल दवते, ए. बी. बनसोडे यांच्यासह तालुक्यातील अनेक शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.




# कॅप्टन अमोल महाडिक यांचा सहकाऱ्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश

## आरक्षणाच्या मुद्द्यावरून जाती जातीत भांडणे पेटवण्याचा सरकारचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचे भाचे कॅप्टन अमोल महाडिक यांनी आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत आपल्या सहकाऱ्यांसह टिळक भवन येथील कार्यक्रमात काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी त्यांचे काँग्रेस परिवारात स्वागत करून शुभेच्छा दिल्या. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित होते.

देशात लोकशाही व संवैधानिक मुल्ये पायदळी तुडवत भाजपा सरकारचा मनमानी कारभार सुरु असून ते देशासाठी अंत्यत घातक आहे, म्हणून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोठा लढा पुकारला आहे. हुकूमशाही प्रवृत्तींच्या हातून देश वाचवणे हे सर्वात महत्वाचे आहे. राहुल गांधी यांनी सुरु केलेल्या लढाईला देशभरातून पाठिंबा मिळत आहे. तरुण वर्गाचाही मोठा पाठिंबा मिळत आहे. राहुल गांधी यांच्या लढ्यात सहभागी होत त्यांचे हात बळकट करण्यासाठी अनेकजण काँग्रेस पक्षात प्रवेश घेत आहेत. कॅप्टन अमोल महाडिक यांनीही तोच मार्ग निवडला असून देशाला खऱ्या अर्थाने काँग्रेसचा विचार व राहुल गांधी यांचे नेतृत्वच तारू शकते हा विश्वास दृढ होत आहे. अमोल महाडिक यांना प्रोफेशनल काँग्रेस विभागात काम करण्याची संधी देण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवाचा पक्षालाही फायदाच होईल", असे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले..“आमचे कुटुंब काँग्रेस विचाराचेच असून आजोबा दत्ताजीराव उर्फ आण्णासाहेब तटकरे हे काँग्रेस पक्षाचे नेते होते. आज काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने घरी आल्यासारखे वाटत आहे. राहुल गांधी यांचे नेतृत्वच देशाला तारु शकणार आहे म्हणून काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे, पक्ष जी जबाबदारी देईल ती समर्थपणे पार पाडेन", असे अमोल महाडिक यावेळी म्हणाले.

**सरकारचाच परवाना रद्द करा**

पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अन्न व औषध विभागाने राज्यात स्वच्छता मोहिम हाती घेत कडक कारवाई सुरु केली आहे. जेथे जेथे अस्वच्छता, घाण पसरली आहे ती साफ झालीच पाहिजे. ज्या हॉटेल वा कॅन्टिनमध्ये अस्वच्छता दिसते व घाणीचे साम्राज्य दिसते त्याचा परवाना रद्द केला जात आहे, तसेच या सरकारवरही कारवाई झाली पाहिजे. हे सरकारच घाणीतून आले असून सगळीकडे घाण पसरवत आहे म्हणून या सरकारचाच परवाना रद्द केला पाहिजे, असे सपकाळ म्हणाले.

**जरांगे यांना आतापर्यंत कोणती आश्वासने दिली**

मनोज जरांगे यांच्या उपोषणावर बोलताना सपकाळ म्हणाले की, भाजपा महायुती सरकाने मनोज जरांगे यांना दोनवेळा आश्वासन दिल्याने त्यांनी आंदोलन मागे घेतले तरीही त्यांना पुन्हा आंदोलन करावे लागत आहे. सरकारने जरांगे यांना याआधी कोणती आश्वासने दिली होती ती जाहीर करावीत. मुळात हे सरकारच



खोटारडे आहे, मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत धनगर समाजाच्या आरक्षणाच्या फाईलवर सही करणार पासून सुरु झालेला हा प्रवास फसवा आहे. आरक्षणाच्या नावावर जाती-जातीत भांडणे लावणे हाच धंदा भाजपा महायुती सरकारचा आहे. सरकारला जर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावायचा असेल तर जातनिहाय जनगणना करावी, ही काँग्रेस पक्षाची मागणी मान्य करावी, असेही सपकाळ म्हणाले..

# न बोललेलं प्रेम आयुष्यभर साथ देणारं नातं




"आई-वडील आपल्याला जन्म देतात, संस्कार देतात, जगायला शिकवतात. पण त्यांच्या आयुष्याचा खरा अर्थ आपल्याला ते गेल्यानंतरच समजतो."

आज माझे आई-वडील या जगात नाहीत. पण त्यांच्या आठवणी, त्यांचे संस्कार आणि त्यांनी जगलेले आयुष्य आजही माझ्या प्रत्येक निर्णयामध्ये, प्रत्येक विचारामध्ये जिवंत आहे. हा लेख माझ्या तात्या आणि माझ्या आईला समर्पित आहे.

माझ्या वडिलांना आम्ही प्रेमाने "तात्या" म्हणायचो आणि आई म्हणजे फक्त "आई". आमच्या आई-वडिलांना एकूण नऊ अपत्ये झाली. पण नियतीने त्यातील पाच मुलींना लहान वयातच हिरावून घेतले. त्या काळची दारिद्र्याने ग्रासलेली परिस्थिती, कुपोषण, अपुरा वैद्यकीय उपचार किंवा एखादा गंभीर आजार—नेमके कारण काहीही असो, पण त्या पाच निष्पाप जीवांच्या जाण्याने आई-वडिलांच्या आयुष्यात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली. शेवटी आम्ही चार भावंडे राहिलो—दोन बहिणी, दोन भाऊ. त्यात मी सर्वात लहान.

आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. पण आमच्या घरात एक गोष्ट कधीच कमी पडली नाही—ती म्हणजे स्वाभिमान. तात्या स्पष्ट बोलणारे, तत्त्वनिष्ठ आणि स्वाभिमानी होते. ते नेहमी म्हणायचे, "परिस्थिती कितीही वाईट असली तरी कोणापुढे लाचार होऊ नका. कोणाची हाजीहूजी करू नका. स्वाभिमानाने जगा." आज माझ्या व्यक्तिमत्त्वात जर काही कणखरपणा असेल, तर तो त्यांच्या संस्कारांचा वारसा आहे.

आई आणि तात्यांचे नाते आजच्या पिढीपेक्षा पूर्णपणे वेगळे होते. प्रेम व्यक्त करण्यासाठी शब्द नव्हते, सोशल मीडियावरील पोस्ट नव्हत्या, हातात हात घालून फिरणे नव्हते. एखाद्या जवळच्या नातेवाईकाच्या लग्नात चुकून दोघांना एकत्र फोटो काढावा लागला तरी आई लाजून जायची. पण प्रेम कधी शब्दांत नसतं; ते आयुष्यभराच्या सहवासात आणि कृतीत असतं.

आईने प्रत्येक संकटात तात्यांना खंबीर साथ दिली. संसार, शेती, मुलं, उपासमार, संघर्ष—सगळं ती शांतपणे पेलत राहिली.

मी माझी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वयाच्या सतराव्या वर्षी घर सोडले आणि मुंबईकडे निघालो. घर सोडताना मनात अनेक स्वप्ने होती; पण मागे वळून पाहताना आईच्या डोळ्यातील पाणी आणि तात्यांच्या मनातील काळजी मला आजही आठवते. तो काळ सोपा नव्हता.

तोपर्यंत दोन्ही बहिणींची लग्ने झाली होती. मोठ्या भावाचेही लग्न झाले होते. परिस्थितीमुळे तो आणि वहिनी दरवर्षी पुणे परिसरात ऊसतोडीसाठी जायचे. गावात मग फक्त आई आणि तात्या दोघेच राहायचे.

लहानसहान कारणांवरून त्यांची भांडणे व्हायची. तेव्हा मला वाटायचं, "हे दोघे एकत्र कसे राहत असतील?" पण माझ्या स्वतःच्या लग्नाला पंधरा वर्षे झाल्यानंतर मला त्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. लग्न जितकं जुनं होत जातं, तितकं नवरा-बायकोचं नातं अधिक घट्ट होत जातं. बाहेरून भांडणं दिसतात; पण आतून एकमेकांशिवाय जगणं अशक्य झालेलं असतं.

लहानपणापासून मी एक गोष्ट पाहत आलो होतो. तात्या प्रेम कधी बोलून दाखवत नसत, पण त्यांचं आईवर किती प्रेम होतं हे त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसायचं. त्या काळी घरातील सर्व कामे स्त्रियांनीच करायची असा अलिखित नियम होता. पण तात्या पहाटे उठून नळावरून पाणी भरून आणायचे, सरपण गोळा करायचे, घरातील अनेक कामे करायचे. त्यांचे काही मित्र त्यांची चेष्टा करायचे; पण त्यांनी कधी त्याची पर्वा केली नाही.

आईची काम करण्याची गती थोडी संथ होती. शेतात नांगरणी सुरू असताना सकाळी सात-आठ वाजेपर्यंत न्याहारी पोहोचवावी लागायची. आईला उशीर होईल हे तात्यांना माहीत असायचं. म्हणून ते घरातून निघताना रात्रीची शिळी भाकर सोबत घेऊन जायचे. आईवर राग काढण्यापेक्षा तिची अडचण समजून घेणारा तो माणूस होता. आज विचार केला की, तेच खरं प्रेम होतं.

काही वर्षांनी आईला कर्करोगाचे निदान झाले. तो धक्का आम्हा मुलांपेक्षा तात्यांना जास्त बसला. पुढची तीन वर्षे त्यांनी आईची ज्या समर्पणाने सेवा केली, ती पाहून जाणवलं की प्रेमाला शब्दांची गरज नसते.

आणि एक दिवस आई कायमची निघून गेली.

त्या दिवसापासून तात्या पूर्णपणे बदलले. त्यांचा रागीट आणि तापट स्वभाव शांत झाला. ज्यांच्यावर आयुष्यभर हक्काने रागवायचं, तीच जीवनसाथी निघून गेल्यावर रागालाही अर्थ उरला नव्हता.

मी त्यांना माझ्यासोबत पनवेलला आणलं. आम्ही सर्व भावंडांनी त्यांना आनंदी ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्यांच्या मनात निर्माण झालेली पोकळी कोणालाच भरून काढता आली नाही. गावचं मोकळं वातावरण, आईच्या आठवणी आणि आयुष्यभराचा सहवास—हे सगळं त्यांच्या मनातून कधीच गेलं नाही. पनवेलमध्येही त्यांना प्रत्येक ठिकाणी आईचीच आठवण यायची.

हळूहळू त्यांचा स्वभाव पूर्ण बदलला. मनापासून हसताना मी त्यांना पुन्हा कधीच पाहिलं नाही. नातवंडांसोबत काही क्षण ते आनंदी व्हायचे; पण तो आनंदही क्षणिक असायचा.

आज मी स्वतः संसार करत असताना मला नवरा-बायकोच्या नात्याचा खरा अर्थ समजतो. हे नातं फक्त प्रेमाचं नसतं; ते आयुष्यभर एकमेकांचा श्वास बनून जगण्याचं असतं. त्यातील एक जण निघून गेला की दुसऱ्याचं आयुष्य सुरू राहतं, पण जगणं मात्र संपून जातं.

आई गेल्यानंतर तात्यांनी जवळपास दहा वर्षे काढली. पण ती दहा वर्षे त्यांनी कशी जगली, हे फक्त त्यांनाच माहीत होतं. अखेर आजारपणानंतर त्यांनीही या जगाचा निरोप घेतला.

आज दोघेही माझ्यासोबत नाहीत.

पण त्यांनी दिलेला स्वाभिमान, कष्टाची तयारी, प्रामाणिकपणा आणि न बोलता प्रेम करण्याची शिकवण माझ्यासोबत कायम आहे.

तात्या आणि आई...

तुम्ही आम्हाला संपत्ती दिली नाही, पण माणूस म्हणून जगण्याची श्रीमंती दिलीत. ती कोणत्याही धनापेक्षा मोठी आहे.

आज तुमची आठवण आली की डोळे पाणावतात. पण त्या अश्रूंमध्ये दुःखापेक्षा अभिमान जास्त असतो.

कारण प्रत्येकाला आई-वडील मिळतात, पण मला तुमच्यासारखे आई-वडील लाभले, हेच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे भाग्य आहे.

**— अजय पांडुरंग कापरे**
**महाराष्ट्र संपादक, दैनिक युवक आधार**

## नागपूर प्रशासनाचा ढिसाळ कारभार: अजनी पोलीस स्टेशनजवळच झाड कोसळले

**साडे तीन तास उलटूनही फांद्या कापण्यास सवड मिळेना! आक्रोश संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शेखर दंताळे यांनी वेधले लक्ष**

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका नागपूर:** शहरातील व्हीआयपी रस्ते आणि मंत्र्यांच्या दौऱ्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करणाऱ्या नागपूर महानगरपालिकेचा ढिसाळ आणि बेजबाबदार कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. तुकडोजी पुतळा ते अजनी पोलीस स्टेशन रस्त्यावरील पोलीस स्टेशनच्या अगदी जवळच आज दुपारी २:४४ वाजता एक मोठे झाड रस्त्यावर कोसळले. धक्कादायक बाब म्हणजे, घटना घडून तब्बल साडे तीन तास उलटून (संध्याकाळी ६:१५ वाजेपर्यंत) गेले तरीही या झाडाच्या फांद्या कापून रस्ता मोकळा करण्यासाठी प्रशासनाला वेळ मिळालेला नाही. आक्रोश संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शेखर दंताळे यांनी प्रशासनाचा हा ढिसाळपणा प्रत्यक्ष पुराव्यासह समोर आणून तीव्र संताप व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, हे घटनास्थळ वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (हनुमान नगर) झोन क्रमांक 3 च्या मनपा कार्यालयापासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर आहे. अगदी अजनी पोलीस स्टेशनच्या नाकतीखाली आणि मनपा कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर एवढी मोठी दुर्घटना होऊन मुख्य रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली असतानाही मनपाचे उद्यान विभाग किंवा आपत्कालीन पथक घटनास्थळी फिरकले नाही, ही बाब डॉ. दंताळे यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. मंत्र्यांचे दावे हवेत; जनता मात्र त्रस्त एकीकडे राज्याचे मंत्री महोदय "आमचे प्रशासन उत्तम कामगिरी करत आहे, आम्ही शहराचा कायापालट करू" असे मोठमोठे दावे करत भाषणे ठोकतात. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती पाहता हे दावे केवळ 'हवेत गप्पा' मारण्यासारखेच आहेत. "आम्ही असं करू, तसं करू" असे म्हणणारे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन संकटसमयी पूर्णपणे हतबल आणि निष्क्रिय ठरल्याचे डॉ. शेखर दंताळे यांनी म्हटले आहे. नागरिकांमध्ये तीव्र संताप अजनी पोलीस स्टेशन परिसरातील या मुख्य मार्गावर झाड पडल्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. पोलीस स्टेशन जवळ असून आणि मनपाचे कार्यालय अवघ्या अर्धा किलोमीटरवर असतानाही अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना इथे पोहोचायला ४ तास लागतात? यावरूनच प्रशासनाच्या 'उत्तम कामगिरीची' पोलखोल होते, अशी टीका आक्रोश संघटने तर्फे करण्यात आली आहे. आता तरी झोपलेले मनपा प्रशासन जागे होऊन हे झाड तातडीने बाजूला करणार की मंत्री महोदयांच्या 'उत्तम कामगिरीच्या' प्रमाणपत्रा आडून आपली सुस्ती अशीच चालू ठेवणार, असा सवाल आता जनता विचारत आहे. झोन अधिकारी म्हणतील तो आमच्या झोन मधील नाही कोणत्याही झोन मधील असो माणुसकी म्हूणन ज्या झोनमध्ये येते त्याना सांगून झाडाच्या फांदया कापून रस्ता 4 वाजेपर्यंतच मोकडा झाला असता.. माणुसकी राहिलीच नाही फक्त यांना पैसा आणि महिण्याचा पगार पाहिजे तेही जनतेच्या पगारातून.. पण जनतेला सोय देणार नाहीत. आधीच पाऊस, कार्यालय, कॉलेज, शाळा सुटण्याची वेळ त्यामुळे ट्रॅफिक जाम होणारच.. अधिकाऱ्यांवर शासनाचे वचक राहिले नाही हिच शोकांतिका..

**आपला**
**डॉ. शेखर दंताळे, नागपूर.**





## कारसुळ शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा; शिष्यवृत्ती परीक्षेत तीन विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवता येते, याची प्रचिती पुन्हा एकदा पीएमश्री जिल्हा परिषद सेमी इंग्लिश डिजिटल प्राथमिक शाळा, कारसुळ येथील विद्यार्थ्यांनी दिली आहे. आंतरराष्ट्रीय युनेस्को सदस्यत्व व आयएसओ मानांकन प्राप्त असलेल्या या शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे कारसुळ गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठीण समजल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत मिळवलेले यश हे त्यांच्या जिद्दीचे, शिक्षकांच्या अथक परिश्रमाचे आणि पालकांच्या सहकार्याचे फलित असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शाळेतील मुख्याध्यापक


रमाकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित सराव, विषयनिहाय मार्गदर्शन, सराव चाचण्या आणि वैयक्तिक शैक्षणिक नियोजनाच्या माध्यमातून स्पर्धात्मक परीक्षेसाठी सक्षम तयारी करून दिली. याच प्रयत्नांना यशाची जोड मिळाल्याने तीन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

**यशस्वी विद्यार्थी :**

वेदांत प्रभाकर जाधव – इयत्ता ७ वी

ओमकार भरत जाधव – इयत्ता ५ वी

कल्याणी विलास ताकाटे – इयत्ता ४ थी

यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन वाकचौरे, ग्रामपंचायत सदस्य तथा शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष देवेंद्र काजळे, सदस्य सुनिल ताकाटे, सोमेश्वर जाधव, संदीप दाते, नंदिप गाडे, चित्रा गुंबाडे, मिनाक्षी गोरे, मोनाली वाघमारे, वैशाली कंक, आम्रपाली जाधव, पूजा बस्ते, खंडेराव शंखपाळ, मुख्याध्यापक रमाकांत शिंदे, उपशिक्षक राजाभाऊ कदम, महेश कोर, प्रतिभा सावंत, कल्याणी वशीकर, प्रिती चौधरी, पदवीधर शिक्षक संदीप बैरागी, वासुदेव पाटील, बालवाटिका शिक्षिका रोहिणी शंखपाळ तसेच सर्व शिक्षक, कर्मचारी व पालक उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भवितव्यास शुभेच्छा दिल्या.

शाळेने अल्पावधीतच आधुनिक शिक्षणपद्धती, डिजिटल सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि स्पर्धा परीक्षांवरील विशेष भर यामुळे तालुक्यात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील हे यश शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष देणारे ठरले असून भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थी अशाच यशाची परंपरा कायम ठेवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

> **'शाळेतील दर्जेदार अध्यापन, आधुनिक शैक्षणिक सुविधा, सातत्यपूर्ण सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांच्या बळावर हे यश मिळाले आहे. या उल्लेखनीय यशामुळे पीएमश्री शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून भविष्यातही अशीच उज्ज्वल यशपरंपरा कायम राहील.'**
>
> **— रमाकांत शिंदे, मुख्याध्यापक**

## श्रीवर्धनच्या धोंडगल्लीत मोठा अनर्थ टळला; डोंगरावरून कोसळलेल्या प्रचंड दगडाने मोटारसायकलचा चुराडा, नागरिकांचा प्रशासनावर संताप

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहरातील धोंडगल्ली परिसरात गुरुवारी दुपारच्या सुमारास मोठा अनर्थ टळल्याची धक्कादायक घटना घडली. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर डोंगराच्या उतारावरील माती वाहून गेल्याने सैल झालेला एक भला मोठा दगड थेट घरांच्या बाजूने खाली कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र दगडाखाली सापडलेल्या एका मोटारसायकलीचा अक्षरशः चुराडा झाला.

श्रीवर्धनमधील अनेक विभागांमध्ये डोंगरालगत वस्ती असून पावसाळ्यात दरवर्षी माती वाहून जाणे, दगड सैल होणे आणि दरडी कोसळण्याचा धोका कायम



असतो. धोंडगल्लीतील नागरिकांनी याबाबत अनेक वेळा प्रशासनाला लेखी व तोंडी सूचना दिल्या होत्या. डोंगराच्या पायथ्याशी संरक्षक भिंत उभारण्याची मागणी सातत्याने करण्यात आली होती. त्यासाठी स्थानिकांनी पाठपुरावाही केला; मात्र आपत्तीजनक परिस्थिती लक्षात घेऊन तातडीची उपाययोजना करण्याऐवजी प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

आज घडलेल्या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले. दगड ज्या ठिकाणी कोसळला, त्या परिसरात घरे अगदी जवळ असल्याने काही क्षण उशीर झाला असता तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, धोकादायक क्षेत्र म्हणून येथील घरांना स्थलांतर करण्याची पत्रे प्रशासनाकडून दिली जातात; परंतु त्याचवेळी त्या भागाच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या संरक्षक भिंती, मातीधूप रोखण्याची कामे, पावसाळी आपत्ती प्रतिबंधक उपाययोजना आणि डोंगर स्थिरीकरण याकडे मात्र गांभीर्याने पाहिले जात नसल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे."लोकांनी घरं सोडा असं सांगितलं जातं, पण सुरक्षिततेसाठी आवश्यक कामं मात्र केली जात नाहीत. प्रशासन नेमकं कोणत्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.घटनेनंतर संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून धोकादायक दगड हटवावेत, संरक्षक भिंत उभारावी, डोंगर स्थिरीकरणाची कायमस्वरूपी कामे हाती घ्यावीत आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्वरित कृती आराखडा जाहीर करावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. धोंडगल्लीतील आजची घटना ही केवळ इशारा नसून भविष्यातील संभाव्य मोठ्या आपत्तीची गंभीर घंटा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## दुर्गम भागातील गरजू विद्यार्थ्यांना मानवता फाउंडेशनकडून छत्री वाटप; वृक्षारोपणातून निसर्ग संवर्धनाचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : सामाजिक बांधिलकी जपत गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या मानवता फाउंडेशनच्या वतीने सुधागड तालुक्यातील सोमजाई शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय, पाच्छापूर येथे विद्यार्थ्यांना छत्री वाटप करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना होणारी गैरसोय लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला.

या प्रसंगी मानवता फाउंडेशनचे अध्यक्ष संजयभाऊ पवार, उपाध्यक्ष विनोद नायर, सचिव विघ्नेश मगानी, संस्थेचे ट्रस्टी दीपकजी घोसाळकर, विशाल बाबर तसेच फाउंडेशनचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी फाउंडेशनच्या वतीने शालेय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. सेवा आणि निसर्ग



संवर्धन या दोन्ही मूल्यांचा संगम साधणाऱ्या या उपक्रमाचे शाळेचे शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी स्वागत केले.

मानवता फाउंडेशनचे पदाधिकाऱ्यांनी समाजातील गरजू घटकांसाठी अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लावतानाच पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक: भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धी प्रिंटर्स, मंगल नगर, मलकापूर, पिन ४४३१०१, जि. बुलढाणा येथे छापून दैनिक प्रकाशित केले आहे. 'दैनिक युवक आधार' मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी, ग्रामपंचायत जवळ, मु.पो. आदई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे.संपादक: भारती संतोष आमले.

Daily Yuvak Aadhar
Printed by Karansingh Prathadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, Mangal Nagar, Malkapur PIN 443101, Dist. Buldhana.Published at Head Office: Daily Yuvak Adhar, Indraprasth Society, Wing Flat No. 203-202, Survey No. 28/1/3, Panvel, Raigad, Adai Panvel Dist. Raigad.Editor: Bharti Santosh Amle.

## अमरावती–दर्यापूर मार्गावर भीषण अपघात : ट्रक–एसटीची समोरासमोर धडक, ट्रक चालक ठार; सात जण गंभीर जखमी




**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दर्यापूर–अमरावती मार्गावरील लखापूर फाट्याजवळ गुरुवारी सकाळी मुसळधार पावसात एसटी बस आणि ट्रक यांच्यात समोरासमोर भीषण धडक होऊन ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात एसटी बसचा चालक, वाहक तसेच बसमधील प्रवाशांसह एकूण सात जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दर्यापूर बसस्थानकातून हिंगणघाटकडे जाणारी एसटी बस आणि समोरून येणारा ट्रक यांच्यात लखापूर फाट्याजवळ जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांच्या समोरील भागाचा अक्षरशः चुराडा झाला. ट्रक चालक श्याम महादेव भुटे (वय ५५, रा. दामोडी) हे ट्रकच्या केबिनमध्ये अडकून पडले.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस, रुग्णवाहिका तसेच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांच्या मदतीने ट्रक चालकाला बाहेर काढून तातडीने दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.या अपघातात एसटी बसचा चालक, वाहक आणि बसमधील सहा प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.अपघातामुळे अमरावती–दर्यापूर मार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला असून मुसळधार पाऊस आणि कमी दृश्यमानता हे प्राथमिक कारण असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# गावाची तहान भागवणारा देवदूत !

## पिंपळ्याचा 'पाणीवाला अवलिया' गोपाल देवळे पाटील यांना जनतेचा सलाम !

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : पिंपळा (मालेगाव)आजच्या स्वार्थी युगात प्रत्येकजण आपल्या कामात व्यस्त असताना, पिंपळा गावातील युवा समाजसेवक गोपाल देवळे पाटील यांनी मात्र माणुसकीचा झरा अखंड वाहता ठेवला. गेल्या उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाईने गाव होरपळत असताना आणि त्यानंतर जून-जुलैच्या पावसाळ्यातही अनेक भागांत पाण्याची समस्या कायम असताना, गोपाल देवळे पाटील यांनी आपल्या टँकरद्वारे गावकऱ्यांना कमी खर्चात घरपोच पाणीपुरवठा करून एक आदर्श निर्माण केला.

गावातील कोणत्याही नागरिकाचा पाण्यासाठी फोन आला की, स्वतःची इतर सर्व कामे बाजूला ठेवून ते तातडीने टँकर घेऊन निघत. अनेकदा दूरवर जाऊन टँकरमध्ये पाणी भरून ते गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी निःस्वार्थपणे केले. त्यांच्या या सेवेमुळे पिंपळ्यातील अनेक कुटुंबांची तहान भागली आणि पाणीटंचाईच्या काळात मोठा दिलासा



मिळाला.विशेष म्हणजे, टँकरद्वारे पाणी पोहोचवल्यानंतर त्यांनी कधीही कोणाकडे पैशांसाठी तगादा लावला नाही किंवा फोन करून पैशांची मागणी केली नाही. "तुमच्या इच्छेनुसार आणि परिस्थितीनुसार जेवढे शक्य असेल तेवढे द्या; अडचण असेल तर नंतर द्या, कोणतीही घाई किंवा बळजबरी नाही," हीच त्यांची कायम भूमिका राहिली. त्यामुळे त्यांच्या सेवेमागे आर्थिक हेतूपेक्षा माणुसकी आणि समाजसेवेची भावना अधिक ठळकपणे दिसून आली. विशेष म्हणजे, या सेवेसाठी त्यांनी अवाजवी पैसे न घेता अत्यंत कमी मोबदल्यात पाणीपुरवठा केला. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांनाही मोठा आधार मिळाला. गावातील अनेक नागरिक आजही सांगतात की, "फक्त एक फोन करा... आणि काही वेळात गोपाल देवळे पाटील यांचा टँकर दारात उभा असायचा."आजच्या काळात प्रत्येक गोष्टीत आर्थिक व्यवहाराला प्राधान्य दिले जात असताना, पैशांपेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व देणारी अशी व्यक्ती क्वचितच पाहायला मिळते. शांत, संयमी आणि मनमिळावू स्वभावामुळे गोपाळ देऊळ पाटील यांनी गावकऱ्यांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.

> 'पाणी ही लोकांची गरज आहे. माझ्या माध्यमातून एखाद्या कुटुंबाची तहान भागत असेल, हेच माझ्यासाठी मोठे समाधान आहे. पैशांपेक्षा माणुसकी मोठी आहे. त्यामुळे सेवाभाव जपत भविष्यातही गावकऱ्यांसाठी नेहमी तत्पर राहीन.'
>
> — गोपाल देवळे पाटील
> युवा समाजसेवक,पिंपळा

सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि सेवाभाव यांचे जिवंत उदाहरण ठरलेले गोपाळ देऊळ पाटील यांचे कार्य गावकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केलेल्या त्यांच्या या कार्यामुळे ते आज पिंपळ्यातील जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.पाणी म्हणजे जीवन. त्या जीवनदायी पाण्याची वेळेवर व्यवस्था करून असंख्य कुटुंबांची तहान भागवणाऱ्या या युवा समाजसेवकाच्या कार्याला आज संपूर्ण पिंपळा गावातून कौतुकाची थाप मिळत आहे.

## चार वर्षीय पीडितेला न्याय; आरोपीला २० वर्षे कारावास

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील नैताळे येथे १४ जानेवारी २०२० रोजी यात्रोत्सवादरम्यान घडलेल्या चार वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी सुदाम भिकाजी सोनवणे (वय ३५, रा. कोळवाडी, ता. निफाड) याला दोषी ठरवत निफाड येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश अब्दुस्सलाम अश्पाक अहमद शेख यांनी २० वर्षे सश्रम कारावास व ₹११ हजार दंड अशी शिक्षा सुनावली. दंडाची संपूर्ण रक्कम पीडितेला भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

घटनेनुसार, नैताळे येथील यात्रोत्सवासाठी कामानिमित्त आलेल्या कुटुंबातील चार वर्षीय मुलगी १४ जानेवारी २०२० रोजी रात्री सुमारे ९ वाजता पाळण्याजवळ खेळत होती. त्यावेळी तिची अल्पवयीन बहीण व भाऊ यांनी वडिलांकडे धावत जाऊन "एक बाबा तिला घेऊन गेला" अशी माहिती दिली. त्यानंतर मुलीचे वडील व इतरांनी यात्रोत्सव परिसरात तिचा शोध सुरू केला.शोध घेत असताना नैताळे त्रिफुलीजवळ धारणगाव रस्त्यावर विद्युत दिव्याच्या उजेडात आरोपी पीडित मुलीला घेऊन जात असल्याचे दिसून आले. संशय आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी आरोपीचे कपडे व हात रक्ताने माखलेले होते. तसेच पीडित मुलीच्या कपड्यांवरही रक्ताचे डाग आढळल्याने गंभीर प्रकार उघडकीस आला. त्यानंतर आरोपीला नैताळे पोलीस चौकीत आणण्यात आले.

पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ३५४(अ), ३६३, ३७६(२)(i), ३७६एबी तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (POC-SO) कायद्याच्या कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.खटल्याच्या सुनावणीदरम्यान विशेष जिल्हा सरकारी वकील रमेश कापसे यांनी फिर्यादी, पीडिता, तिची अल्पवयीन बहीण, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी यांच्यासह एकूण १९ साक्षीदारांचे जबाब नोंदवून प्रभावी युक्तिवाद केला. न्यायालयीन कामकाजात महिला पोलीस शिपाई कल्पना पवार यांनी कोर्ट पैरवीचे काम पाहिले.न्यायालयासमोर सादर झालेल्या साक्षी, वैद्यकीय पुरावे आणि इतर दस्तऐवजांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानुसार विविध कलमांखाली स्वतंत्र शिक्षा सुनावत, कलम ३७६एबी अंतर्गत २० वर्षे सश्रम कारावास ही प्रमुख शिक्षा ठोठावण्यात आली. तसेच सर्व शिक्षा व दंडासह एकूण ₹११ हजारांची रक्कम पीडितेला भरपाई म्हणून अदा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

## खेळणा नदीच्या पुरामुळे केळगावात दोन्ही मुक्कामी बस अडकल्या

### वाहतूक ठप्प; प्रवासी व चालक-वाहकांना मनस्ताप

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, तालुक्यातील नदी-नाल्यांना जोरदार पूर आला आहे. याचा प्रत्यक्ष फटका सार्वजनिक परिवहन व्यवस्थेला बसला असून, काल केळगाव येथील खेळणा नदीच्या पुलावरून पुराचे पाणी वाहत असल्याने सिल्लोड आगाराच्या मुर्डेश्वरहून सिल्लोडकडे येणाऱ्या दोन मुक्कामी बस पाण्यात अडकून पडल्याची घटना घडली. या दोन्ही मुक्कामी बस सामान्यतः सकाळी सिल्लोड येथे पोहोचतात; परंतु पुराची बिकट स्थिती असल्यामुळे पाणी ओसरण्याची प्रतीक्षा करावी लागल्याने त्या काल दुपारी सिल्लोड येथे पोहोचल्या. केळगाव येथील कमी उंचीच्या पुलावरून खेळणा नदीचा पाण्याचा तीव्र लोंढा थेट पुलावरून वाहत होता. पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे या मार्गावरील रस्ते वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एसटी महामंडळाच्या चालकांनी अत्यंत जबाबदारीने व अचूक वेळेत प्रसंगावधान राखत आपल्या बस सुरक्षित अंतरावर थांबवल्या.असे असले तरी, बसमध्ये शाळकरी मुले, महिला, नोकरदारांसह काही आजारी रुग्ण देखील प्रवास करत असल्यामुळे त्यांना आणि इतर सर्व प्रवाशांना या भीषण पूरस्थितीमध्ये मोठा मनस्ताप सहन करावा लागला. प्रवाशांना जीव मुठीत धरून तासनतास प्रतीक्षा करावी लागली. विशेष म्हणजे, या लांबलेल्या प्रवासामुळे बसमधील प्रवाशांसह चालक व वाहक यांनाही ताटकळत राहावे लागले व त्यांना अन्नाविना व पाण्यासाठी त्रास सहन करावा लागला. तसेच या घडामोडीमुळे एसटी आगाराच्या पुढील फेऱ्यांचे व वेळापत्रकाचे नियोजन देखील पूर्णपणे कोलमडले व बिघडले. दरम्यान, नदीवरील पुराचा पाण्याचा प्रवाह ओसरल्यानंतर व परिस्थिती काहीशी पूर्वपदावर आल्यानंतर चालकांनी नियमांचे



> **दरवर्षीचीच हेळसांड; पुलाच्या कामाबाबत केवळ घोषणाबाजी!**
>
> केळगाव येथील खेळणा नदीवरील या पुलाची प्रशासकीय व भौगोलिक समस्या अतिशय जुनी आहे. दरवर्षी पावसाळ्यात प्रवाशांना, ग्रामस्थांना आणि विशेषतः आजारी रुग्णांना याच बिकट आणि जीवाला धोका निर्माण करणाऱ्या परिस्थितीचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे, पूरस्थिती निर्माण झाल्यावर प्रशासकीय व लोकप्रतिनिधी स्तरावर केवळ प्रत्यक्ष पाहणी करून औपचारिकता पूर्ण केली जाते. या पुलाच्या नवीन बांधकामासाठी केवळ आश्वासनांची औपचारिकता पाळली जाते, परंतु प्रत्यक्ष ग्राउंड स्तरावर कोणतीही ठोस व स्थायी उपाययोजना केली जात नाही, असा तीव्र संताप व रोष स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

पालन करत बस सुरक्षितपणे बाहेर काढल्या, ज्यामुळे सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला.दरवर्षी होणाऱ्या या प्रशासकीय व प्रवाशांच्या हेळसांडीतून कायमची मुक्तता करण्यासाठी या ठिकाणी उच्च पातळीचा मोठा आणि उंच पूल लवकरात लवकर उभारण्यात यावा, अशी आक्रमक व न्याय्य मागणी जोर धरत असून प्रशासनाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

## मुसळधार पावसातही वंचित बहुजन आघाडीच्या संघटनात्मक निवडणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद; अमरावतीत शांततेत मतदान प्रक्रिया पार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका अमरावती, प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेश संघटनात्मक निवडणूक 2026 अंतर्गत अमरावती येथील संघमित्र हॉस्टेल मतदान केंद्रावर गुरुवार, 30 जुलै 2026 रोजी शांततेत आणि नियमानुसार मतदान प्रक्रिया पार पडली. मुसळधार पाऊस सुरू असतानाही नोंदणीकृत सभासद मतदारांनी मोठ्या उत्साहाने मतदानाचा हक्क बजावत लोकशाही प्रक्रियेवरील आपला विश्वास दृढ केला.

या निवडणुकीत एकूण 311 नोंदणीकृत मतदार असून त्यापैकी 137 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. प्रतिकूल हवामान असूनही विविध तालुक्यांतील सभासद मतदानासाठी केंद्रावर उपस्थित राहिल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह आणि संघटनेप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली.

श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत संघटनेच्या संविधान, नियम व कायदेशीर प्रक्रियेचे काटेकोर पालन करून संपूर्ण मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान शिस्त, पारदर्शकता आणि लोकशाही




मूल्यांचे पालन करण्यात आले.

या निवडणुकीचे कामकाज निवडणूक अधिकारी राहुल मेश्राम आणि अशोक नवलकार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तसेच युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा, करण जाधव, सागर भोवते, अमोल जंवजाळ (मदतनीस), शैलेश बांगडे, प्रमोद राऊत, पश्चिम जिल्हाध्यक्ष संजयजी चौरपगार आणि युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष अंकुश वाघबाजार यांनी निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततेत, शिस्तबद्ध वातावरणात आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पडल्याने उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. मुसळधार पावसातही सभासदांनी दाखविलेल्या उत्स्फूर्त सहभागामुळे वंचित बहुजन आघाडीच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही निवडणूक महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## यशोमती ठाकूर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी, खेळाडू आणि प्रा. डॉ. प्रशांत विघे यांचा भव्य गौरव; गुरुपौर्णिमा उत्सवात शिक्षण, क्रीडा व संस्कारांचा जागर

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका अमरावती (प्रतिनिधी):** स्थानिक बुधवारा परिसरातील आझाद हिंद मंडळातर्फे गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त तसेच देशभक्त स्व. नानासाहेब बामणगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थी, खेळाडू व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या सत्काराचा भव्य सोहळा उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. शिक्षण, क्रीडा, सामाजिक कार्य आणि बौद्धिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करून समाजात उत्कृष्ट कार्याची दखल घेण्याची परंपरा जपणाऱ्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमात माजी पालकमंत्री तथा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या यशोमती ठाकूर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी, राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळविणारे खेळाडू तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यशोमती ठाकूर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यशावर न थांबता समाजाभिमुख विचार, संस्कार आणि राष्ट्रप्रेम जोपासावे, असे आवाहन केले. गुणवंतांचा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला सकारात्मक दिशा मिळते, असे त्यांनी सांगितले.याच कार्यक्रमात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य तथा भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रशांत विघे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. राज्यशास्त्र विषयातील संशोधन, लेखन, अध्यापन आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल



त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी आजपर्यंत राज्यशास्त्र, लोकप्रशासन, भारतीय राज्यघटना, राजकीय प्रक्रिया, सामाजिक व समकालीन विषयांवर तब्बल ४२ पुस्तके प्रकाशित केली असून, त्यांच्या संशोधनपर लेखनाला राज्यभरातून मोठी दाद मिळाली आहे. संशोधक, लेखक, स्तंभलेखक आणि अभ्यासक म्हणून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच समाजप्रबोधनाच्या कार्यातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याने उपस्थितांनी त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व अधोरेखित करताना, गुरु हे ज्ञान, संस्कार आणि जीवनमूल्यांचे आधारस्तंभ असल्याचे सांगितले. समाजातील गुणवंत विद्यार्थी, खेळाडू आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असून, अशा गौरव सोहळ्यांमुळे कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन मिळते आणि इतरांनाही उत्कृष्ट कार्य करण्याची प्रेरणा मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला महापौर श्रीचंद तेजवानी, महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विलास इंगोले, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, शहरातील नगरसेवक, नगरसेविका, विविध सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, पालक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी सन्मानित विद्यार्थी, खेळाडू आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधून त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर आयोजित हा सत्कार सोहळा शिक्षण, संस्कार, कर्तृत्व आणि समाजसेवेचा गौरव करणारा संस्मरणीय उपक्रम ठरला.


## जाहीर नोटीस

सर्व संबंधित नागरिकांना जाहीर सूचना

मी, एजास वहाब बेग, रा. सवना, ता. महागाव, जि. यवतमाळ, यांच्यातर्फे ही जाहीर नोटीस देत आहे की, माझे वडील वहाब बेग करीम बेग यांचा जन्म दिनांक 30/12/1949 रोजी झालेला असून त्यांच्या जन्माची नोंद संबंधित जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये उपलब्ध नाही.

सदर जन्मनोंद महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, 1969 मधील कलम 13(3) अन्वये नोंदविण्याची कार्यवाही सुरू असून त्यासाठी संबंधित कार्यालयाने वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रकाशित करण्यास सांगितले आहे.

त्यामुळे वहाब बेग करीम बेग यांच्या जन्माबाबत अथवा जन्मनोंदणीसंबंधी कोणत्याही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप किंवा माहिती असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 15 (पंधरा) दिवसांच्या आत आवश्यक पुराव्यासह जन्म व मृत्यू नोंदणी प्राधिकरण, पंचायत समिती महागाव येथे लेखी स्वरूपात सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, कोणताही आक्षेप नसल्याचे गृहीत धरून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

**अर्जदार :**
**एजास वहाब बेग**
**रा. सवना, ता. महागाव,** **सही**
**जि. यवतमाळ.** **तहसीलदार महागाव**

# किरकोळ घरगुती अपघाताने ओढवले मोठे संकट; डॉक्टरांनी वाचवला 31 वर्षीय तरुणाचा पाय

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : घरातील एक साधा अपघात 31 वर्षीय तरुणासाठी आयुष्य बदलणारा ठरला. घरातील काचेच्या शेल्फला पाय आदळल्यानंतर शेल्फचा काच तुटून त्याचे तुकडे पायात खोलवर घुसले. या अपघातात त्याच्या पायातील अकिलीस टेंडन (Achilles Tendon), पाच महत्त्वाचे स्नायू, दोन मज्जातंतू आणि एक प्रमुख धमनी पूर्णपणे कापली गेली. त्यामुळे त्याच्या चालण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र, मेडिकव्हर हॉस्पिटलमधील प्लास्टिक अॅण्ड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जन डॉ. अतीव सिंग यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने यशस्वी शस्त्रक्रिया करून रुग्णाचा पाय वाचवला आणि त्याला पुन्हा स्वतंत्रपणे चालण्याची संधी मिळवून दिली.



नवी मुंबईतील रहिवासी श्री. नमन कुमार (नाव बदललेले)* यांचा 23 जुलै रोजी हा अपघात झाला. काचेच्या शेल्फला धडक लागताच ती तुटली आणि काचेचे धारदार तुकडे त्यांच्या पायात खोलवर घुसले. त्यामुळे प्रचंड रक्तस्राव आणि असह्य वेदना सुरू झाल्या. सुरुवातीला ही साधी जखम वाटत असली तरी प्रत्यक्षात ती अत्यंत गंभीर स्वरूपाची होती. त्यांना तातडीने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तिथे आपत्कालीन विभागाने रक्तस्राव नियंत्रणात आणून रुग्णाची प्रकृती स्थिर केली.

याबाबत माहिती देताना मेडिकव्हर हॉस्पिटलचे प्लास्टिक, कॉस्मेटिक आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जन डॉ. अतीव सिंग म्हणाले,* एमआरआय आणि सीटी अँजिओग्राफीसह सविस्तर तपासणीत दुखापतीची तीव्रता स्पष्ट झाली. या अपघातात अकिलीस टेंडन( हे आपल्या शरीरातील सर्वात मोठे स्नायुबंध असते जे पायाच्या भागात असते)पूर्णपणे तुटले होते. तसेच फ्लेक्सर हॅल्युसिस लॉन्गस, पेरोनियस ब्रेव्हिस, पेरोनियस लॉन्गस, फ्लेक्सर डिजिटोरम लॉन्गस आणि टिबियालिस पोस्टेरियर हे पाच महत्त्वाचे स्नायू, मज्जातंतू तसेच पायाला रक्तपुरवठा करणारी पोस्टेरियर टिबियल धमनी पूर्णपणे कापली गेली होती. काचेमुळे झालेल्या जखमा वरवर लहान दिसल्या तरी आतून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असू शकते. अशा परिस्थितीत वेळीच उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. आमचे उद्दिष्ट केवळ पाय वाचवणे नव्हते, तर त्याची हालचाल, संवेदना, रक्तपुरवठा आणि रुग्णाची स्वतंत्र जीवनशैली पुन्हा पूर्ववत करणे हे होते.

दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेऊन रुग्णावर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. सुमारे चार तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांच्या टीमने तुटलेला अकिलीस टेंडन दुरुस्त केला, पाचही स्नायू पुन्हा जोडले, पोस्टेरियर टिबियल आर्टरीची पुनर्बांधणी करून रक्तपुरवठा सुरळीत केला आणि टिबियल व सुरल मज्जातंतूंची सूक्ष्म शस्त्रक्रियेद्वारे दुरुस्ती केली.

डॉ. सिंग पुढे म्हणाले,* शस्त्रक्रियेदरम्यान विशेष वाढीव दृश्य तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जखमेची तपासणी करण्यात आली. रक्ताभिसरण पुन्हा सुरू करण्याबरोबरच पायाच्या हालचालींसाठी आवश्यक असलेले स्नायू, स्नायुबंध आणि मज्जातंतू यांची काळजीपूर्वक पुनर्बांधणी करण्यात आली. ही सर्व संरचना चालताना पाय पुढे ढकलण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली असून रुग्णाची प्रकृती सध्या चांगली आहे. त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले असून पुढील काही महिन्यांत फिजिओथेरपी आणि पुनर्वसनाच्या माध्यमातून हळूहळू हाडांना बळकटी, हालचाल आणि आत्मविश्वास पुन्हा मिळवता येतो.

ते पुढे म्हणाले,* अशा शस्त्रक्रियांचे यश केवळ शस्त्रक्रियेवर अवलंबून न राहता वेळीच वैद्यकीय मदत आणि त्यानंतरचे पुनर्वसनही तितकेच महत्त्वाचे असते. काचेमुळे झालेल्या खोल जखमांकडे कधीही दुर्लक्ष करू नका. टेंडन, मज्जातंतू,

## चार तासांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेने रुग्णावर यशस्वी उपचार

धमनी किंवा स्नायूंना इजा झाल्यास त्वरित वैद्यकीय मदत घेतली पाहिजे. योग्य वेळी निदान आणि शस्त्रक्रिया झाल्यास कायमस्वरूपी अपंगत्व टाळता येऊ शकते.

रुग्ण श्री. नमन कुमार म्हणाले,* हे सर्व काही काही क्षणात घडले असून सुरुवातीला मला ही साधी जखम वाटली होती. मात्र नंतर पायातील महत्त्वाच्या संरचनांचे गंभीर नुकसान झाल्याचे समजल्यानंतर मी आणि माझे कुटुंब खूप घाबरलो होतो. मी पुन्हा कधी नीट चालू शकेन का याची भीती वाटत होती. आता मी बरा होत आहे आणि लवकरच कोणत्याही आधाराशिवाय चालण्याची आशा आहे. डॉ. अतीव सिंग आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मी मनापासून आभार मानतो.मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबईचे महाराष्ट्र आणि कर्नाटक विभागाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल म्हणाले,* गंभीर दुखापतींच्या रुग्णांमध्ये जलद निदान, अत्याधुनिक शस्त्रक्रिया कौशल्य आणि विविध विभागांमधील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये आम्ही रुग्णांचे अवयव वाचवण्याबरोबरच त्यांचे कार्यक्षम जीवन पुन्हा पूर्ववत करण्यासाठी कटिबद्ध आहोत.

मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबईचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले,* ही घटना गंभीर दुखापतीनंतर त्वरित वैद्यकीय उपचार घेण्याचे महत्त्व अधोरेखित करते. वेळीच उपचार केल्यास कायमस्वरूपी अपंगत्व टाळणे शक्य आहे.

# विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी युवासेनेची ठाम भूमिका; विल्फ्रेड महाविद्यालय प्रशासनाला ७ दिवसांचा अंतिम अल्टिमेटम!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील शेडूंग येथील विल्फ्रेड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या गंभीर तक्रारींची दखल घेत युवासेना लोकसभा अध्यक्ष पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय प्रशासनाची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर समाधानकारक कार्यवाहीसाठी प्रशासनाला ७ दिवसांचा अंतिम अल्टिमेटम देण्यात आला.



विद्यार्थ्यांनी मांडलेल्या तक्रारींमध्ये प्रवेश माहितीपत्रकाचा अभाव, शुल्क संरचनेतील अस्पष्टता, विद्यार्थी परिषद व वैधानिक समित्या कार्यरत नसणे, महिला विकास कक्षाचा अभाव, तक्रार निवारण यंत्रणेतील त्रुटी, संकेतस्थळ अद्ययावत नसणे, मूळ कागदपत्रे वेळेत न मिळणे, गुणपत्रिकांबाबत संभ्रम तसेच विद्यार्थ्यांशी अयोग्य वर्तन अशा गंभीर मुद्द्यांचा समावेश आहे.

युवासेनेने शासन नियम व विद्यापीठाच्या तरतुदींनुसार सर्व मुद्द्यांवर लेखी स्पष्टीकरण आणि तातडीने सुधारात्मक उपाययोजनांची मागणी केली आहे. निर्धारित मुदतीत कार्यवाही न झाल्यास विद्यार्थ्यांच्या सहभागासह लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. तसेच संपूर्ण प्रकरण संबंधित विद्यापीठ, उच्च शिक्षण संचालनालय, UGC, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा आणि अन्य सक्षम प्राधिकरणांकडे सादर करण्यात येईल.

युवासेनेची भूमिका कोणत्याही संस्थेविरोधात नसून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांशी तडजोड करणाऱ्यांना कायदेशीर व लोकशाही मार्गाने जाब विचारला जाईल.

यावेळी उपस्थित जिल्हाध्यक्ष प्रीतम सुर्वे, रोशन पुजारी, जिल्हा सचिव रोहन ढोले, विधानसभा संपर्क प्रमुख अभिनय सोमण, तालुका अध्यक्ष ऋषिकेश सोगे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सागर रोकडे, महानगर अध्यक्ष प्रेम ठाकूर, विभाग अध्यक्ष गौरव खांडेकर, शहर उपाध्यक्ष फरहाद शेख, सोशल मीडिया शहर समन्वयक साई म्हाप्सूगु यांच्यासह अन्य पदाधिकारी.

# पाण्यात बुडाल्याने 16 वर्षीय तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : कोंडीची वाडी येथे पाण्यात बुडून सोळा वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना 30 जुलै रोजी सायंकाळी घडली. अभिषेक एलिया ढालवाणी (राहणार अय्यप्पा मंदिराच्या पाठीमागे, सुकापुर) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 30 जुलै रोजी वाजेगावच्या पुढे बाबदेववाडी आणि कोंडीची वाडी ओव्हर ब्रिज खाली नदीच्या पात्रामध्ये अभिषेक ढालवाणी आणि त्याचे चार मित्र फिरण्यासाठी गेले होते. कोंडीची वाडी ब्रिजच्या खालील नदीपात्रात पोहण्यासाठी ते उतरले. अभिषेक याला पोहता येत नव्हते. यावेळी पाण्यात त्याचा पाय घसरला आणि तो बुडाला. चारही मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला मात्र पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पनवेल तालुका पोलीस आणि अग्निशामक दलाला देण्यात आली. पोलिस आणि अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले त्यांनी अभिषेक याला बाहेर काढले. मात्र त्याचा मृत्यू झाला होता.

# स्वच्छतेचे खरे हिरो सन्मानित; निफाड नगरपंचायतीत 'सफाई कर्मचारी दिन' उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : स्वच्छ, सुंदर आणि निरोगी निफाड शहर घडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या स्वच्छता सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी निफाड नगरपंचायतीच्या वतीने शुक्रवार (दि. ३१ जुलै) रोजी नगरपंचायत कार्यालयात 'सफाई कर्मचारी दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी स्वच्छता विभागातील सर्व महिला व पुरुष सफाई कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या निस्वार्थ सेवेला मानवंदना अर्पण करत, शहराच्या स्वच्छतेचा खरा पाया हेच स्वच्छता कर्मचारी असल्याचे गौरवोद्गार काढले. प्रत्येक ऋतूत, प्रत्येक परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी हे कर्मचारी अविरत सेवा बजावत असल्याने त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही समाजाची नैतिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, मुख्याधिकारी धिरज भामरे, नगरपंचायतीचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच स्वच्छता विभागातील महिला व पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात स्वच्छता राखण्याचा सामूहिक संकल्प करण्यात आला. शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनविण्यासाठी नागरिकांनीही स्वच्छता कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि सन्मानाची भावना हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. त्यांच्या कार्याचा गौरव करून निफाड नगरपंचायतीने समाजापुढे कृतज्ञतेचा आदर्श निर्माण केला.

# शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ रायगड जिल्ह्यातील १२६८२ पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे** : महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील शेतकयांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू असून, जिल्ह्यातील १२६८२ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या यादीत ७५४४ पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभमिळणार आहे. त्यापैकी आजपर्यंत १९८० इतक्या शेतक-यांनी आधार प्रमाणीकरण केलेले आहे उर्वरीत पात्र लाभार्थ्याने आपले आधार प्रमाणीकरण तात्काळ करुन घेण्याचे अवाहन मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ मध्ये शासनाने दि.०९जून २०२६ रोजी सर्व व्यापारी बँकाना पत्र देऊन अनुत्पादित वर्गवारीतील खात्याना विशिष्ट प्रमाणात सवलत (Haircut) देण्याबाबत निर्देश दिले आहेत त्याचप्रमाणे शासनाने दिनांक



१ जुलै २०२६ रोजी सर्व बँकाना पत्र देऊन १ एप्रिल २०२६ नंतर योजनेअंतर्गत शेतक-यांच्या कर्जखात्यावर व्याजाची आकारणी न करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे गावपातळीवर प्रसिध्द केलेली यादी व योजनेच्या पोर्टलवरील शेतक-यांच्या थकबाकी रक्कमेत फरक असल्यास योजना पोर्टलवरी थकबाकीची रक्कम ग्राहय धरावी व इतर कोणताही भार शेतक-यांवर लादू नये. शासनाने अनुत्पादित कर्जखात्यांबाबत बँकानी खालीलप्रमाणे सवलत देण्याबाबत सुचित केले आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या यादी मध्ये रु.२.०० लाखापर्यत थकबाकी असलेल्या कर्जखात्याचा समावेश आहे. उर्वरित कर्जखात्यांचा समावेश त्याचप्रमाणे रु.२.०० लाखावरील समावेश यानंतर प्रसिध्द होणा-या यादयामध्ये करण्यात येणार असून त्यांनाही योजनेचा लाभ दिला जाईल. योजनेचा लाभ थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व अॅग्रीस्टॅक (AgriStack) नोंदणी अनिवार्य आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. तसेच, शासनाच्या निर्णयानुसार वेळेत पीककर्जाची परतफेड करणाया पात्र शेतकऱ्यांना रु.५०,००० पर्यंत प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या बँकेशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत, खासगी, ग्रामीण व सहकारी बँकांनी आपल्या खातेदार शेतकऱ्यांना योजनेबाबत तातडीने मार्गदर्शन करून आधार प्रमाणीकरण, अॅग्रीस्टॅक नोंदणी व आवश्यक माहिती अद्ययावत करण्यासाठी सहकार्य करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच, सर्व महा-ई-सेवा केंद्रे (Maha e-Seva Kendra) व कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) यांनी शेतकयांचे आधार प्रमाणीकरण पूर्णपणे विनामूल्य करून द्यावी. या सेवांसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारू नये. शुल्क आकारल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग कार्यालय अथवा संबंधित तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा. रायगड जिल्ह्यातील सर्व पात्र शेतक-यांनी योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, तनवीर पाटील यांनी केले आहे.

# चंदनझिरा परिसरात नाल्यांचे पाणी थेट रस्त्यावर; नागरिक त्रस्त, महानगरपालिकेच्या दुर्लक्षाविरोधात संताप

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : शहरातील चंदनझिरा परिसरातील रोहिदास महाराज मंदिर, बाजार गल्ली, एकता चौक, ममता नगर तसेच अनेक भागांमध्ये नाल्यांचे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. पावसामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून दुर्गंधी,




घाण आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

रोहिदास महाराज मंदिर परिसरात नाल्यांमधून येणाऱ्या असह्य दुर्गंधीमुळे भाविक व स्थानिक नागरिक त्रस्त आहेत. तर बाजार गल्ली, एकता चौक आणि ममता नगर येथे नाल्यातील पाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने पादचारी, विद्यार्थी, व्यापारी आणि वाहनचालकांना घाणीतून मार्ग काढावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेकदा महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने नाल्यांची साफसफाई करून रस्त्यावर येणारे सांडपाणी थांबवावे आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या सहभागातून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## दीपस्तंभ प्रतिष्ठान, नांदेड जिल्हा आयोजित बुद्धिस्ट गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ 2026 उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : प्रकाश गवारे** : दीपस्तंभ प्रतिष्ठान, नांदेड जिल्हा आयोजित बुद्धिस्ट गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ 2026 हा कार्यक्रम दि. 26 जून 2026 रोजी आंबेडकरवादी मिशन, सिडको, नांदेड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



या गौरव सोहळ्यात मुदखेड येथील कु. ऋतिका बाळकृष्ण चौदंते हिने इयत्ता दहावीमध्ये 82 टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल मुदखेड तालुक्यातील गुणवंत बुद्धिस्ट विद्यार्थीनी म्हणून निवड झाली. तिच्या शैक्षणिक यशाचा गौरव करत तिला संविधान पुस्तिका, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. दीपक कदम (केंद्रप्रमुख, आंबेडकरवादी मिशन) होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. संजय खंडारे (अधीक्षक अभियंता, महावितरण मंडळ कार्यालय, नांदेड), मा. डॉ. प्रीती कदम (एम.डी. मेडिसिन, कॅन्सरतज्ज्ञ, सनशाईन कॅन्सर हॉस्पिटल, नांदेड), उद्घाटक मा. राहुल कर्डिले (जिल्हाधिकारी, नांदेड), मा. नंदन नांगरे (शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे) तसेच मा. डॉ. संदीप वाघमारे मुधोळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व पटवून देत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कु. ऋतिका चौदंते हिच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## महामार्ग पोलिसांची महामार्गावर कौतुकास्पद कामगिरी; चिमुकल्या पिल्लांचे वाचवले प्राण

**दैनिक युवक आधार**
**विजय खुडे हिंगोली जिल्हा प्रतिनिधी** : नेहमी कडक शिस्त, वाहतूक नियमन आणि गुन्हेगारांवर वचक यासाठी ओळखल्या जाणाऱ्या पोलिसांचे एक अत्यंत संवेदनशील आणि माणुसकीने भरलेले रूप महामार्गावर पाहायला मिळाले. भरधाव वेगाने गाड्या धावणाऱ्या महामार्गावर मृत्यूच्या दाढेत अडकलेल्या कुत्र्याच्या निष्पाप पिल्लांना महामार्ग पोलिसांनी अत्यंत तत्परतेने सुरक्षित बाहेर काढून त्यांना जीवदान दिले आहे. पोलिसांच्या या कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



महामार्गावर वाहतूक सुरळीत ठेवण्याचे काम करत असताना महामार्ग पोलिसांच्या कर्मचाऱ्यांना जारोडा फाट्यावर रस्त्याच्या कडेला/दुभाजकाजव कुत्र्याची काही लहान पिल्ले अडकल्याचे निदर्शनास आले. महामार्गावरून गाड्यांचा वेग प्रचंड असल्याने ही निष्पाप पिल्ले कोणत्याही क्षणी वाहनाखाली येऊन अपघाताचा बळी ठरण्याची भीती होती.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महामार्ग पोलिसांच्या पथकाने क्षणाचाही विलंब न लावता तात्काळ वाहतूक सुरक्षित केली आणि स्वतःचा जीव धोक्यात घालून त्या पिल्लांना सुरक्षितपणे बाजूला घेतले.व सुरक्षित स्थळी नेऊन सोडले

(सुव्यवस्था राखणे हे आमचे कर्तव्य आहेच, पण त्याचसोबत कोणत्याही जीवाचे संरक्षण करणे ही आमची पहिली जबाबदारी असते. निष्पाप प्राण्यांचे प्राण वाचवू शकलो, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.'
साईनाथ अनमोड साहेब PSI )

"पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मनोगत:"

"रस्त्यावर कायदा व सुव्यवस्था राखणे हे आमचे कर्तव्य आहेच, पण त्याचसोबत कोणत्याही जीवाचे संरक्षण करणे ही आमची पहिली जबाबदारी असते . निष्पाप प्राण्यांचे प्राण वाचवू शकलो, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे."

**सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव**

महामार्ग पोलिसांच्या या प्रसंगावधान आणि भूतदयेमुळे एका मोठ्या दुर्घटनेतून या मूक प्राण्यांचे प्राण वाचले आहेत. खाकी वर्दीमागे असलेल्या या संवेदनशील माणसाचे दर्शन घडल्यानंतर स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि प्राणिप्रेमींकडून पोलिसांच्या या कामगिरीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. खाकीतील माणुसकीचे हे रूप समाजात एक सकारात्मक संदेश देऊन गेले आहे. महामार्ग पोलीस मदत केंद्र हिंगोली मौजे येलकी येथील PSI साईनाथ अनमोड साहेब. पोलीस अंमलदार गजानन कोरडे. तानाजी खोकले दिनकर बांगर संदीप घुगे तयब अल्ली यांच्या कामगिरी चे सर्वत्र कौतुक होत आहे

## रामपूरच्या मोनालीची राष्ट्रीय स्तरावर झेप; टाटा स्टील फाउंडेशनच्या प्रतिष्ठित नेतृत्व कार्यक्रमासाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : छोट्याशा गावातून मोठी स्वप्ने पाहणाऱ्या आणि समाजासाठी काहीतरी वेगळे करण्याची जिद्द बाळगणाऱ्या रामपूर येथील कु. मोनाली शांताराम धुर्वे यांनी आपल्या कर्तृत्वाची राष्ट्रीय स्तरावर दखल घ्यायला भाग पाडले आहे. टाटा स्टील फाउंडेशनच्या प्रतिष्ठित **Tribal Youth Leadership Program 2026** साठी त्यांची निवड झाली असून, हा सन्मान मिळवणाऱ्या महाराष्ट्रातील अवघ्या तीन युवतींपैकी त्या एक आहेत.





यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील पेसा क्षेत्रातील रामपूर गावातील मोनाली सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय आहेत. समाजाप्रती असलेली त्यांची बांधिलकी, नेतृत्वाची क्षमता आणि बदल घडवून आणण्याची धडपड याच गुणांच्या जोरावर त्यांना ही संधी मिळाली आहे. देशभरातील विविध राज्यांमधून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १०० आदिवासी युवक-युवतींची निवड करून टाटा स्टील फाउंडेशन हा नेतृत्व विकास कार्यक्रम राबवते.

बंगळुरू येथे झालेल्या आठ दिवसांच्या प्रशिक्षणात मोनाली यांनी नेतृत्व, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक परिवर्तन, समुदाय सक्षमीकरण आणि आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध विषयांचे प्रशिक्षण घेतले. या अनुभवामुळे त्यांना समाजासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची नवी दिशा आणि आत्मविश्वास मिळाला आहे.

रामपूरसारख्या ग्रामीण भागातून राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठित कार्यक्रमात निवड होणे ही केवळ मोनाली यांची वैयक्तिक कामगिरी नसून, संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही त्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात उल्लेखनीय योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## राजेंद्र काळे यांची काँग्रेसच्या छ.संभाजीनगर ग्रामीण जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मान्यतेनुसार छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी राजेंद्र सुरेश काळे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार कल्याणराव काळे तसेच काँग्रेस पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस पदी सांवळदबारा येथील सुनील नारायण माकोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष दिलीप देशमुख,व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेनंतर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.राजेंद्र काळे पाटील यांनी यापूर्वी सोयगाव तालुका काँग्रेस अध्यक्ष म्हणून केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी



सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीमुळे सोयगाव तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून,राजेंद्र काळे पाटील व सुनील माकोडे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन अधिक मजबूत होईल,असा विश्वास दिलीप देशमुख तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी सोयगाव, सुनील चोरमाले सोशल मीडिया अध्यक्ष सोयगाव, सुनील माकोडे जिल्हा सरचिटणीस संभाजीनगर, प्रमोद कोते,दीपक गव्हाणे,विजय रावळकर,केशव रावळकर,सुनील चव्हाण,अजय चव्हाण,पृथ्वीराज चव्हाण,संजय गिरी,गोकुळ सिंग राजपूत,विजय बावस्कर व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## निसर्गाचा तडाखा ! आर्णी तालुक्यातील लोणी येथील खंडारे परिवारावर शोककळा

### वाहनासह तिन्ही मृतदेह बोरिगोसावीजवळ बरामद अखेर आशा मावळल्या; भीषण नैसर्गिक आपत्तीत संपूर्ण परिवार संपला

**दैनिक युवक आधार**
**आर्णी तालुका प्रतिनिधी-मुरली राठोड आर्णी:** निसर्गाच्या लहरीपणाने आणि प्रकोपामुळे आर्णी तालुक्यातील लोणी येथील प्रतिष्ठित खंडारे परिवारावर काळाने अत्यंत क्रूर घाव घातला आहे. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या तीव्र शोधमोहिमेदरम्यान, सर्वांच्या प्रार्थना आणि अथांग प्रयत्नांना दुर्दैवाने यश आले नाही. अखेर खंडारे परिवारातील तिघांचेही मृतदेह बोरिगोसावी (ता. यवतमाळ) परिसराजवळ त्यांच्या वाहनासह मिळून आल्याची अत्यंत काळीज पिळवटून टाकणारी बातमी समोर आली आहे.

**काय होती घटना?**

निसर्गाच्या या भीषण प्रकोपामध्ये अचानक आलेल्या महाप्रलयात ही दुर्घटना घडली. पूरपरिस्थिती किंवा पाण्याच्या तीव्र प्रवाहात वाहन वाहून गेल्यामुळे ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच प्रशासकीय यंत्रणा, स्थानिक नागरिक आणि आपत्कालीन पथकांकडून अहोरात्र शोधमोहीम राबवण्यात आली. मात्र, निसर्गाच्या या रौद्ररूपापुढे मानवी प्रयत्न हतबल ठरले आणि बोरिगोसावी परिसरात वाहन आढळून आल्यानंतर या दैवी अंताची निष्पत्ती झाली.

**शोकसागरात बुडालेला परिसर**

या हृदयद्रावक घटनेमुळे लोणीसह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात तीव्र शोककळा पसरली आहे. एकाच कुटुंबातील तीन सदस्यांवर अशा प्रकारे काळाने झडप घातल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून, संपूर्ण परिसर अतीव शोकसागरात बुडाला आहे. या दुर्दैवी घटनेने मनाला सुन्न करून सोडले आहे.


भावपूर्ण श्रद्धांजली

**दिवंगत आत्म्यांना कोटी कोटी भावपूर्ण श्रद्धांजली!**

परमेश्वर दिवंगत आत्म्यांना आपल्या चरणी स्थान आणि चिरशांती देवो. तसेच, या अकल्पित संकटाने उद्ध्वस्त झालेल्या खंडारे परिवारास आणि त्यांच्या सर्व आप्तस्वकीयांना हे अपरिमित दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## मालेगाव येथे श्री १००८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिरात अष्टान्हिका पर्व उत्साहात संपन्न

**दैनिक युवक अधार**
**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे** : मालेगाव येथील श्री १००८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिरात अष्टान्हिका पर्व भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात आनंदाने संपन्न झाले. या धार्मिक पर्वानिमित्त मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. मालेगाव जैन महिला मंडळाच्या सानिध्यात अष्टान्हिका पर्वानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते अष्टान्हिका पर्व हे जैन धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते. या पर्वाच्या काळात भगवान जिनेंद्र देवांची भक्तिभावाने पूजा-अर्चना, अभिषेक, शांतिधारा, जिनवाणी श्रवण, स्वाध्याय तसेच विविध धार्मिक उपक्रमांमध्ये भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मंदिरातील भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते जैन महिला मंडळाच्या महिला



सदस्यांनी धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन व आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. भक्तीभावाने करण्यात आलेल्या धार्मिक विधींमुळे भाविकांना आध्यात्मिक समाधान मिळाले. यावेळी महिला मंडळाच्या सानिध्यात भक्तिगीते, धार्मिक स्तवन आणि जिनेंद्र भगवान यांच्या चरणी भक्तिभावाने आराधना करण्यात आली अष्टान्हिका पर्वाच्या निमित्ताने आदिनाथ भगवानांच्या चरणी मंगलमय वातावरणात पूजा-अर्चना करून सर्वांच्या सुख, शांती, समृद्धी आणि आरोग्यासाठी मंगलकामना करण्यात आली. जैन समाजातील महिला, पुरुष, युवक तसेच बालकांनीही मोठ्या उत्साहाने या धार्मिक पर्वात सहभाग नोंदवून धर्मलाभ घेतला या पर्वामुळे मालेगाव शहरातील जैन समाजामध्ये धार्मिक एकोपा संस्कार आणि अध्यात्मिक वातावरण अधिक दृढ झाले अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. अष्टान्हिका पर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन महिला मंडळ तसेच मंदिराशी संबंधित सर्व श्रावक-श्राविकांनी परिश्रम घेतले

## चिखलात भरतोय मालेगावचा आठवडी बाजार ! जनतेच्या जीवाशी सुरू आहे धोकादायक खेळ; नगरपरिषद झोपेत ?

### घाणीच्या साम्राज्यातूनच विकला जातो भाजीपाला, फळे आणि जीवनावश्यक वस्तू; नागरिकांमध्ये संतापाची लाट

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव शहरातील आठवडी बाजाराची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून संपूर्ण बाजारपेठ चिखल, साचलेले पाणी आणि घाणीच्या विळख्यात अडकली आहे. पावसाळ्यात बाजारात येणाऱ्या हजारो नागरिकांना चिखल तुडवत खरेदी करावी लागत आहे. यापूर्वीही या समस्येबाबत अनेकदा वृत्तपत्रांमधून बातम्या प्रसिद्ध झाल्या, नागरिकांनी तक्रारी केल्या, मागण्या केल्या; मात्र आजतागायत नगरपरिषद प्रशासन, मुख्याधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

मालेगाव शहरासह संपूर्ण तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो नागरिक प्रत्येक आठवड्याला या बाजारात खरेदीसाठी येतात. महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, शेतकरी आणि व्यापारी यांची मोठी गर्दी असते. मात्र बाजाराच्या ठिकाणी सर्वत्र चिखल, साचलेले घाणेरडे पाणी आणि कचऱ्याचे ढीग असल्यामुळे प्रत्येक पाऊल टाकताना अपघाताची भीती निर्माण झाली आहे.

याच घाणीच्या वातावरणात भाजीपाला, केळी, फळे, किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंची विक्री होत आहे. नागरिक हे साहित्य घरी घेऊन जातात आणि त्याच वस्तू आपल्या जेवणात वापरल्या जातात. अशा अस्वच्छ वातावरणामुळे संसर्गजन्य आजार, दूषित अन्नामुळे होणारे आजार आणि आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

व्यापाऱ्यांनाही चिखलात बसून व्यवसाय करावा लागत आहे. ग्राहकांना बाजारात फिरताना मोठी कसरत करावी लागत असून अनेक ठिकाणी चिखलात पाय घसरून पडण्याच्या घटनाही घडत असल्याची माहिती समोर येत आहे. अशा परिस्थितीतही प्रशासनाकडून ना स्वच्छतेची मोहीम, ना पाण्याचा निचरा, ना कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्याने



संताप वाढत आहे.नागरिकांचा प्रश्न आहे की, करांच्या माध्यमातून महसूल जमा करणारी नगरपरिषद जनतेला किमान स्वच्छ आणि सुरक्षित बाजारपेठही देऊ शकत नसेल तर जबाबदार कोण? शासन नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी प्रशासनाला पगार देते की जनतेच्या जीवाशी खेळण्यासाठी, असा संतप्त सवाल आता बाजारात येणाऱ्या नागरिकांकडून विचारला जात आहे.लोकप्रतिनिधी निवडून दिल्यानंतर जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. केवळ आश्वासने आणि कागदी विकास नको, तर प्रत्यक्षात आठवडी बाजार स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, अशी जोरदार मागणी नागरिक, व्यापारी आणि ग्राहकांकडून होत आहे.

**जनतेचा थेट सवाल...**

"मालेगावच्या आठवडी बाजारातील चिखल, घाण आणि साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. अनेक वेळा बातम्या प्रसिद्ध होऊनही प्रशासन जागे का होत नाही? आणखी एखादा गंभीर अपघात किंवा साथीचा रोग पसरल्यानंतरच कारवाई होणार का?"

**नागरिकांच्या प्रमुख मागण्या..**

आठवडी बाजार परिसराची तातडीने संपूर्ण स्वच्छता करावी.

पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

बाजार परिसरात खडी, पेव्हर ब्लॉक किंवा काँक्रीट रस्ता करावा.

नियमित स्वच्छता पथक आणि कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था करावी.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने बाजार परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवावा.

**प्रशासनाला इशारा..**

"बातम्या, तक्रारी आणि निवेदने देऊनही प्रश्न सुटत नसेल, तर नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याची वेळ येईल," अशी प्रतिक्रिया बाजारातील व्यापारी व नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# शोषित-वंचितांचे वाली, क्रांतीकारी विचारसम्राट: लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

## 'फकीरा' ते 'माझी मैना': महाराष्ट्राच्या समतावादी आणि स्वातंत्र्यलढ्यातील अमर साहित्यिक!

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : शब्दांना हत्यार केलं, लेखणीला तलवार बनवलं आणि आयुष्यभर शोषितांचे प्रतिनिधित्व केलं, अशा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आपण १ ऑगस्ट रोजी साजरी करत आहोत. त्यानिमित्ताने म्हणावसं वाटतं की, साहित्याच्या प्रेमिंनो, समतेच्या स्वप्नात जगणाऱ्यांनो, आज आपण केवळ एका साहित्यिकाची नव्हे, तर क्रांतीकारी विचारांच्या साहित्यसम्राटाची जयंती साजरी करत आहोत.

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे होते, तर त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव व आईचे नाव वालुबाई होते. त्यांचे शालेय शिक्षण पद्धतशीरपणे पूर्ण झालेले नाही; त्यांनी अवघ्या दीड दिवसामध्येच शाळेत जाणे सोडले होते. परंतु, केवळ पुस्तकी ज्ञानाने माणूस परिपूर्ण होत नाही, तर अनुभवाने माणसाचे कर्तृत्व गरुडासारखे महान होते, हे अण्णाभाऊंनी सिद्ध केले. अण्णाभाऊ दीड दिवसच शाळेत गेले असले, तरी त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेने व अक्षरज्ञानाने साहित्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली. अण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानायचे आणि अभिमानाने सांगायचे, "जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव."

महाराष्ट्रामध्ये अण्णाभाऊंची प्रतिमा एका लोकप्रिय लोकशाहीराची आहे. आपल्या लेखनीतून त्यांनी आक्रमक व प्रबोधनाचे विचार मांडले आणि सामाजिक प्रश्नासंदर्भात जनचेतना निर्माण केली. लोकांना हक्कांसाठी



जागरूक करून त्यांनी झोपलेल्या समाजात सामाजिक क्रांतीची मशाल जागवली. जणू त्यांना म्हणायचे होते, 'माझ्या झोपलेल्या पिढ्या मला जाग्या करायला पाहिजेत, सूर्य झोपतो का कधी, असे वागायला पाहिजे.' याच विचारामुळे देशाचा स्वातंत्र्यलढा, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आणि गोवा मुक्ती आंदोलन या सर्वच चळवळींमध्ये अण्णाभाऊ साठे यांचा सक्रिय सहभाग होता.

अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राला केवळ शाहीर म्हणून परिचित असले, तरी कथा आणि कादंबरी हे साहित्यप्रकारही त्यांनी अत्यंत ताकदीने हाताळले. मराठी साहित्यातील लोकवाङ्मय, कथा, नाटक, लोकनाट्य, कादंबऱ्या, चित्रपट, पोवाडे, लावणी, गवळण आणि प्रवासवर्णन यांसारखे सर्वच प्रकार त्यांनी सशक्त व समृद्ध केले. तमाशा या कलेला 'लोकनाट्याची' प्रतिष्ठा मिळवून देण्याचे श्रेय अण्णाभाऊंनाच जाते. देशवासीयांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी एका कलाकाराच्या भूमिकेतून ते प्रत्येक आंदोलनात सहभागी होत असत. यामुळे त्यांनी लिहिलेले पोवाडे व लावणी या मुक्ती चळवळींमध्ये नवी ऊर्जा आणि जोश निर्माण करत असत. १९४४ मध्ये त्यांनी 'लाल बावटा पथक' स्थापन केले आणि खऱ्या अर्थाने ते शाहीर म्हणून उदयास आले. 'माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली' ही त्यांची अत्यंत गाजलेली लावणी होती. अण्णाभाऊंनी छत्रपती शिवरायांचे चरित्र पोवाड्यातून रशियन भाषिकांपर्यंत पोहोचवले, पुढे त्याचे रशियन भाषेत भाषांतर झाले आणि तत्कालीन व्यासपीठावरही त्यांचा सन्मान झाला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय व सामाजिक प्रश्नांविषयी महाराष्ट्रात त्यांनी मोठी जागृती केली. यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गोवा मुक्ती संग्राम यांमधील त्यांचे शाहिरी योगदान ऐतिहासिक आणि कायदेशीररित्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. १६ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांनी "ये आझादी झूठी है, देश की जनता भूकी है" असा परखड नारा दिला होता.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या अल्पायुष्यात अत्यंत उत्कृष्ट अशी साहित्य रचना केली. त्यांनी २१ ग्रंथसंग्रह आणि ३० पेक्षा अधिक कादंबऱ्यांची रचना केली. त्यांनी लिहिलेल्या 'फकीरा' या कादंबरीला १९६१ मध्ये राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. या कादंबरीमध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांचे खनिजे, अन्नधान्य व संपत्ती लुटून आपल्या देशातील गरिबांना व शोषितांना वाटप करणाऱ्या 'फकीरा' या लढाऊ तरुणाचे वास्तववादी चित्रण केलेले आहे. 'वैजयंता' या कादंबरीत तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे, तर 'माकडाची माळ' या कादंबरीत भटक्या विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे अत्यंत सूक्ष्म चित्रण केलेले आढळते.

अण्णाभाऊ साठे मराठी साहित्याला लाभलेले खरोखरच एक अनमोल रत्न होते. त्यांची निरीक्षण शक्ती अत्यंत सूक्ष्म होती, त्यामुळे त्यांच्या लेखनशैलीला मराठमोळे, रांगडे आणि लोभस रूप लाभले आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यातून समाजातील विषमतेची दरी नष्ट करण्याचे सामर्थ्य दिसून येते. आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत आपल्या समृद्ध कलेने त्यांनी समाजसुधारणेचे उद्दिष्ट साध्य केले; म्हणूनच महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या व विचारवंतांच्या यादीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव सदैव अजरामर राहील.

म्हणतात ना, व्यक्ती जन्माने नव्हे तर कर्तृत्वाने आणि विचाराने ओळखली जाते. अशा प्रकारे, लोकशाहीर व साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे निधन १८ जुलै १९६९ रोजी झाले असले, तरी आजही त्यांच्या क्रांतीकारी साहित्यातून ते सर्वसामान्यांच्या मनात अमर आहेत.

**लेखक: डॉ. रमेश देविदास काळे**
**(श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, सिल्लोड)**

---

# डॉ. श्रीकांत आवारे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; खेडलेझुंगेतील संतवन-नक्षत्रवन रस्त्याच्या रुंदीकरणास अखेर सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर श्री क्षेत्र खेडलेझुंगे येथील संतवन-नक्षत्रवन परिसरातील रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाला अखेर प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामामुळे भाविक, ग्रामस्थ आणि पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे.



या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी डॉ. श्रीकांत आवारे यांनी महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, समीर भुजबळ तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाशिक जिल्हाध्यक्ष दिलीप खैरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांनंतर संबंधित विभागाने या कामाला मंजुरी देत प्रत्यक्ष कामास प्रारंभ केला.

रस्ता दोन्ही बाजूंनी अडीच-अडीच मीटरने रुंद करण्यात येणार आहे. सुरुवातीला या ठिकाणी केवळ मुरूम टाकून काम पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, डॉ. श्रीकांत आवारे यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांच्याशी सातत्याने संपर्क साधून केवळ औपचारिक काम न करता प्रत्यक्ष रुंदीकरण करण्याचा आग्रह धरला. त्यानंतर या कामाला गती मिळाली.

रस्ता रुंद झाल्यानंतर श्री क्षेत्र संतवन-नक्षत्रवन येथे येणाऱ्या भाविक, पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांची वाहतूक अधिक सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत होणार आहे. त्यामुळे परिसराच्या विकासालाही चालना मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.या महत्त्वपूर्ण कामासाठी सहकार्य करणारे मंत्री छगन भुजबळ, समीर भुजबळ, दिलीप खैरे, संबंधित अधिकारी, प्रशासन तसेच या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे डॉ. श्रीकांत आवारे यांचे खेडलेझुंगे ग्रामस्थांनी आभार मानले.

---

# दर्यापूर बाजार समितीत अविश्वास ठराव फसला; सभापती सुनील गावंडे यांचे पद कायम

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील सत्तासंघर्षाला गुरुवारी नाट्यमय वळण मिळाले. बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांच्याविरोधात विरोधी गटाने दाखल केलेला अविश्वास प्रस्ताव आवश्यक संख्याबळाच्या अभावी फेटाळला गेला. जिल्हा निबंधकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रक्रियेत विरोधी गटाला अपेक्षित बहुमत मिळू न शकल्याने सभापती सुनील गावंडे यांचे पद कायम राहिले.अविश्वास ठराव मंजूर करण्यासाठी आवश्यक संख्याबळाची गरज असताना मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान विरोधी गटातील एका संचालकाच्या अनुपस्थितीमुळे समीकरण बदलले. परिणामी



ठरावाला आवश्यक पाठिंबा मिळू शकला नाही आणि प्रस्ताव बारगळला.गेल्या काही दिवसांपासून बाजार समितीतील राजकीय घडामोडींना वेग आला होता. विरोधी गटाने सभापतींविरोधात मोर्चेबांधणी करत अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर जिल्हा निबंधकांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रक्रिया पार पडली. बैठकीकडे सहकार व राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले होते. राजकीय वर्तुळात चर्चेनुसार, विरोधी गटाने सभापतींना पदावरून दूर करण्यासाठी मोठी रणनीती आखली होती. मात्र, ऐनवेळी एका संचालकाच्या गैरहजेरीमुळे विरोधकांचे संख्याबळ अपुरे पडले. त्यामुळे अविश्वास प्रस्ताव मंजूर होऊ शकला नाही.अविश्वास प्रस्ताव फेटाळल्यानंतर सभापती सुनील गावंडे समर्थकांनी समाधान व्यक्त करत हा विश्वासाचा विजय असल्याची प्रतिक्रिया दिली. दुसरीकडे विरोधी गटाने पुढील राजकीय भूमिका काय असणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.दरम्यान, या संपूर्ण घडामोडीमुळे दर्यापूर तालुक्यातील सहकार आणि राजकीय क्षेत्रात नव्या चर्चांना उधाण आले असून, बाजार समितीतील आगामी कारभार आणि राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# २०० क्षयरुग्णांना फूड बास्केटचे वाटप; आमदार विनोद अग्रवालांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्य शासनाच्या निर्देशानुसार २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत राज्यभर विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. त्याअंतर्गत गोंदिया तालुक्यात प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत २०० क्षयरुग्णांना फूड बास्केटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी पुढाकार घेतला. जिल्हा परिषद गोंदियाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या माध्यमातून लाभार्थी क्षयरुग्णांची निवड करून त्यांना फूड बास्केटचे वितरण करण्यात आले.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या विशेष अभियानात विविध आरोग्य तपासण्या, ग्रामपंचायत स्तरावरील जनजागृती तसेच प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत 'निक्षय मित्र' उपक्रमावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन 'निक्षय मित्र' बनावे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल क्षयरुग्णांना पोषण आहारासाठी फूड बास्केट उपलब्ध करून देऊन टीबीमुक्त भारत अभियानाला बळकटी द्यावी, असे आवाहन केले.

---

# जय भवानी महाविद्यालयात गुरुपोर्णिमा उत्साहात साजरी; विद्यार्थ्यांनी केला सर्व शिक्षकांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात गुरु पोर्णिमा उत्साहात साजरा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर गढी चे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ.सुनिल जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा.डॉ.कल्पना घारगे व प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी



विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ.विश्वास कदम व सर्व प्राध्यापक वृंदाचा गुरुपोर्णिमे निमित्त सत्कार केला. गुरुपोर्णिमा निमित्त कु.आकांक्षा मकाळ, कु.मुंढे अस्मिता, कु.कार्तिकी जगदाळे, कु.ढवळे अक्षरा, कु.ढवळे प्रतिक्षा, कु.शेख नवशाद, कु, कांडेकर श्रावणी, कु.तांबारे दिक्षा व विनायक बडे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी मनोगत व्यक्त करताना गुरु पोर्णिमेचे महत्व सांगितले. शेवटी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी गुरु -शिष्याच्या नात्यासारखे पवित्र नाते दुसरे कोणतेही नाते नाही हे सांगुन जिवनात गुरुचे महत्वाचे स्थान असुन आपण सर्व जन गुरुमुळेच घडलो आहोत. तेव्हा सदैव गुरुबाबत आदर ठेवावा असे सांगितले. व गुरु पोर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचलन प्रा.अशोक देवगुडे यांनी केले. तर आभार प्रा.बंडू लोखंडे यांनी व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

---

## भवानीनगर पोलिसांची धडाकेबाज कारवाई ?

# ट्रॅक्टर चोरीच्या टोळीचा पर्दाफाश ? चार आरोपी जेरबंद,आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय** : भवानीनगर परिसरात घडलेल्या ट्रॅक्टर चोरीच्या मालिकेचा छडा लावण्यात भवानीनगर पोलिसांना महत्त्वाचे यश आले असून, या प्रकरणी आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.या कारवाईमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, भवानीनगर पोलिसांच्या तपासाचे कौतुक होत आहे.या प्रकरणातील तपासाची अधिकृत माहिती पोलिसांकडून अद्याप जाहीर करण्यात आलेली नसली,तरी तपास अत्यंत गोपनीय पद्धतीने सुरू असल्याचे समजते.




दरम्यान,या प्रकरणातील काही आरोपी प्रतिष्ठित कुटुंबांतील असल्याची चर्चा परिसरात रंगली असून,पोलिस मात्र कोणत्याही दबावाला न जुमानता पुराव्यांच्या आधारे तपास पुढे नेत असल्याचे सांगितले जात आहे.प्राथमिक माहितीनुसार,निंबोडी गावासह परिसरात ट्रॅक्टर, ट्रॉली,डम्पिंग ट्रॉली आणि विद्युत मोटारींच्या चोरीत सहभागी असलेले आरोपी या कारवाईत पोलिसांच्या जाळ्यात अडकले आहेत.श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या एका माजी संचालकांची ट्रॉली,निंबोडी गावातील ट्रॅक्टर तसेच परिसरातील डम्पिंग ट्रॉलींसह जवळपास सात ट्रॅक्टर-ट्रॉली व इतर साहित्य चोरीला गेल्याची चर्चा असून,या सर्व घटनांचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. या प्रकरणाचा तपास अधिक खोलवर सुरू असून,आणखी काही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.चोरीच्या मालिकेमागील संपूर्ण रॅकेट उघड करण्यासाठी पोलिसांकडून विविध ठिकाणी चौकशी व पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे दरम्यान भवानीनगर पोलिसांनी अल्पावधीत चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत आरोपींना अटक केल्याने नागरिकांनी त्यांच्या कामगिरीचे स्वागत केले आहे. पुढील तपासातून या टोळीचे आणखी धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# 'रासप' चे सरकार आल्याशिवाय धनगर आरक्षण प्रश्न सुटणार नाही - अशोक हाके

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ धनगर समाजाची भाजपाने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फसवणूक केली भारतीय जनता पक्ष हा आरक्षण विरोधी पक्ष असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला दिलेल्या फसव्या आश्वासनाला आज १२ वर्ष पूर्ण झाले आहेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ( आर एस एस) देखील कोर्टात धनगर समाजाच्या आरक्षणाला विरोध केला आहे त्यामुळे केवळ मोर्चा आणि आंदोलने काढुन हा प्रश्न सुटणार नाही तर राष्ट्रीय समाज पक्षाचे सरकार सत्तेत आल्याशिवाय धनगर समाज इतर उपेक्षित वर्गातील प्रश्न सुटणार नाहीत असे विधान परभणी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाप्रमुख अशोक हाके यांनी केले परभणी येथे धनगर समाज बांधवांनी विश्वासघात दिवस पाळत भारतीय जनता पक्षाच्या सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध केला यावेळी बोलताना श्री हाके यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली त्या



फसव्या आश्वासनाला आज १२ वर्षं पूर्ण झाली श्री हाके म्हणाले की भाजपने सत्तेत येण्यापूर्वी पहिल्या कॅबिनेट बैठकीत धनगर समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते तर आजही धनगर समाजाच्या पदरात काहीच पडलेले नाही उलट आर एस एस ने न्यायालयात धनगर समाजाच्या आरक्षणाच्या विरोधात जाऊन पाठीत खंजीर खुपसला आहे भाजप आणि आर एस एस धनगर विरोधी चेहरा आता पूर्णपणे उघडा पडला आहे " सत्ता परिवर्तन हाच एकमेव पर्याय "केवळ रस्त्यावर उतरून आंदोलने व मोर्चे काढून हा गुंतागुंतीचा प्रश्न सुटणार नाही असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे परभणी जिल्हाअध्यक्ष अशोक हाके म्हणाले धनगर समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी राजकीय ताकद निर्माण करणे गरजेचे आहे जोपर्यंत राष्ट्रीय समाज पक्षाचे सरकार महाराष्ट्रात आणि दिल्लीत सत्तेत येत नाही तोपर्यंत उपेक्षित वर्गातील आणि धनगर समाजाचे प्रश्न कायम स्वरुपी सुटु शकत नाहीत आगामी काळात धनगर समाज या विश्वासघाताचे चोख उत्तर भाजपा सरकारला देईल यावेळी धनगर बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी सरकार विरोधात तीव्र घोषणाबाजी करत धनगर समाजाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, ओझर येथे सन २०२६–२७ च्या विद्यार्थी मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**ओझर प्रतिनिधी राकेश शर्मा** : पोदार इंटरनॅशनल स्कूल, ओझर येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी विद्यार्थी मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास, शिस्त आणि सेवाभाव विकसित करण्याच्या शाळेच्या ध्येयाला अधोरेखित करणारा हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आकर्षक स्वागत नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के, शाळा समन्वयक वैशाली वाघ, मुख्याध्यापिका श्रावणी कामुजू तसेच प्रशासन अधिकारी विशाल मेंढे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी नव्याने निवड झालेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना शुभेच्छा देत त्यांचा उत्साह वाढविला.

यानंतर नवनिर्वाचित विद्यार्थी मंत्रिमंडळातील सदस्यांनी पद व गोपनीयतेची शपथ घेतली. शपथविधीनंतर सर्व विद्यार्थी प्रतिनिधींना नियुक्ती प्रमाणपत्रे व अधिकृत बॅज प्रदान करण्यात आले. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के यांच्या हस्ते शाळेच्या पंतप्रधान रिमशा सिन्हा हिला न्याय, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि आदर्श नेतृत्वाचे प्रतीक असलेला 'सेंगोल' प्रदान करण्यात आला.




या माध्यमातून विद्यार्थी नेत्यांना प्रामाणिकपणे, शिस्तबद्धपणे व निःस्वार्थ सेवाभावाने नेतृत्व करण्याची प्रेरणा देण्यात आली.

यावर्षीच्या विद्यार्थी मंत्रिमंडळात भर्गव पी. साळुंखे (अध्यक्ष), रिमशा सिन्हा (पंतप्रधान), आराध्या पी. क्षीरसागर (गृहमंत्री), आनंदी ए. जोशी (अर्थमंत्री), आर्यन एस. जोंधळे (आरोग्यमंत्री), आराध्या के. तुपके (माहिती व प्रसारण मंत्री), मयंक एस. सोनवणे (वाहतूक मंत्री), सिद्धेश के. पाटील (क्रीडामंत्री), श्रावणी ए. मोगल (कायदा व न्यायमंत्री) आणि किमया एम. जाधव (सांस्कृतिक मंत्री) यांची नियुक्ती करण्यात आली.

स्वतंत्र सचिव म्हणून श्रेयस पी. अहिरे, साई वाय. दयारे, शरण्या जोंधळे व आराध्या सिंह यांची शिस्त सचिव, आराध्या पांगव्हाणे व ओम डी. गुंड यांची प्रार्थना सभा सचिव, तर प्रणिता वारे, प्रदेश जी. वाकळे, अर्पिता राठोड व सादवी मुरला यांची स्वच्छता सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.हाऊस सचिव म्हणून विजय एस. लागड, तेजस्विनी व्ही. गवारे, आराध्या पी. विश्वकर्मा आणि वरद एस. पांगव्हाणे यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच अभिमन्यू डी. मार्गामवार, सार्थक व्ही. भगत, आर्यन बोरस्ते, साक्षी के., मयंक वाय. सोनवणे आणि रावी चौधरी यांनी प्रीफेक्ट म्हणून जबाबदारी स्वीकारली.

विद्यार्थी नेत्यांना वर्षभर मार्गदर्शन करण्यासाठी काजल जाधव (अक्वा हाऊस), अर्चना ठाकरे (टेरा हाऊस), गौरव माळी (इग्निस हाऊस) आणि नितीन ठाकरे (व्हेंटस हाऊस) यांची हाऊस समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ते विद्यार्थी नेतृत्व विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अनन्या कामुजू, वैष्णवी उगले, स्तक्षा क्षीरसागर आणि रेणुका क्रापे यांनी केले. विद्यार्थी मंत्रिमंडळ शपथविधी सोहळ्याचे महत्त्व नितीन ठाकरे यांनी उपस्थितांना सविस्तरपणे सांगितले.यावेळी प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचे अभिनंदन करून त्यांना प्रामाणिकपणा, शिस्त, समर्पण, जबाबदारी आणि सेवाभाव या मूल्यांचे पालन करत आदर्श विद्यार्थी नेता बनण्याचे आवाहन केले. आपल्या कृतीतून इतर विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करण्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रवीण कदम यांनी केले. क्रीडा शिक्षक राकेश शर्मा, संगीत शिक्षक रोशन पवार, कला शिक्षक सागर वायचळे तसेच मयुरी सुरेवारे यांनी कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय यशस्वीरीत्या पार पाडला. प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाची प्रेरणा निर्माण करणाऱ्या उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

# तरुणाईचा चेहरा : अभिजित दीपके

काल जंतर-मंतरवरील आंदोलनाला मिळालेल्या यशाने देशातील तरुणाईची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली. 'झेन झी' पिढी काय करू शकते, याची प्रचिती या आंदोलनातून संपूर्ण देशाला आली.

नीट परीक्षेतील कथित गोंधळानंतर विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. हा रोष वेळेत शांत करणे गरजेचे होते. मात्र, सरकारने या आंदोलनाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले नाही, अशी भावना अनेक विद्यार्थ्यांमध्ये होती.

सामान्य कुटुंबातील अभिजित दीपके यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील हजारो तरुण एकत्र आले. या झेन झी पिढीने आपल्या एकजुटीच्या बळावर "हम से बड़ा कोई नहीं" हा संदेश प्रभावीपणे दिला.

अभिजित दीपके भारतात परतल्यानंतर सुरुवातीपासूनच त्यांची प्रमुख मागणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, हीच होती. अखेर जंतर-मंतरवरील आंदोलनानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याने आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागणीला यश मिळाले आणि संघटित तरुणाईच्या सामर्थ्याची प्रचिती देशाला आली.

या आंदोलनाचा प्रमुख चेहरा म्हणून उदयास आलेल्या अभिजित दीपके यांच्याविषयी बोलायचे झाल्यास, तो अमेरिकेत उच्च शिक्षण घेत स्वतःचे भविष्य घडवत होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयातील एका न्यायाधीशांनी केलेल्या एका टिप्पणीच्या पार्श्वभूमीवर 'कॉक्रोच जनता



पार्टी' या इन्स्टाग्राम पेजची स्थापना करण्यात आली.

ज्या तरुणांना 'झुरळ' अशी उपमा देण्यात आली होती, त्याच तरुणांच्या भावना, वेदना आणि असंतोषाला या पेजने प्रभावीपणे आवाज दिला. अल्पावधीतच या पेजशी इन्स्टाग्रामवर तब्बल २२ दशलक्ष (२.२ कोटी) सदस्य जोडले गेले.

यानंतर अभिजित दीपके याने स्वतःच्या करिअरपेक्षा लाखो विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढण्याचा मार्ग स्वीकारला. त्यासाठी तो भारतात परतला आणि आंदोलनाचे नेतृत्व करत तरुणांच्या संघर्षाचा प्रभावी चेहरा बनला.

अभिजित दीपके याचा संघर्ष हा केवळ एका व्यक्तीचा प्रवास नव्हता, तर तो लाखो विद्यार्थ्यांच्या न्यायासाठीच्या लढ्याचे प्रतीक ठरला. या प्रवासात त्याला अनेक संकटांचा सामना करावा लागला. आंदोलनादरम्यान त्याला मारहाण झाली, अंगावर शाई फेकण्यात आली, तसेच पोलिसांच्या कारवाईलाही त्याला सामोरे जावे लागले. मात्र, कितीही अडथळे आले तरी त्याने संघर्षाची वाट सोडली नाही.

भारतीय संविधानावरील त्याचा दृढ विश्वास आणि सामाजिक न्यायासाठीची बांधिलकी यामुळेच त्याला प्रत्येक संकटावर मात करण्याची ताकद मिळाली. दिल्लीच्या जंतर-मंतरवर सुरू झालेला हा लढा पुढे देशभरातील अनेक शहरांमध्ये पोहोचला. विद्यार्थ्यांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविण्यात आला.

जंतर-मंतरवरील आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते आणि शास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांचाही पाठिंबा लाभला. उपोषण, आंदोलने आणि सातत्यपूर्ण जनजागृतीमुळे या संघर्षाने राष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधून घेतले. अखेर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले आणि हा लढा तरुणांच्या एकजुटीचे प्रतीक ठरला.

अभिजित दीपके याचा त्याग, संघर्ष, चिकाटी आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य आज अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान आहे.

स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यापेक्षा समाजहिताला प्राधान्य देत त्याने उभारलेला हा लढा तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्याच्या जिद्दीला, सामाजिक बांधिलकीला आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी केलेल्या संघर्षाला सलाम.

**शिवाजी पवार प्रतिनिधी**
**दैनिक युवक आधार**

# जिल्हातील बहुतांश शेतकऱ्यांनी फिरवली पीक विम्याकडे पाठ !! जाचक अटीं व नियमामुळे शेतकरी नाराज !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे अकोला प्रतिनिधी** : हवामान बदलामुळे शेती क्षेत्रात मोठी अनिश्चितता निर्माण झाली असताना, दुसरीकडे जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी यंदा पीक विम्याकडे पाठ फिरवल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पीक विमा योजनेतील जाचक अटी व नियमांमुळे नुकसान भरपाई मिळणे कठीण झाले असून, यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. या समस्येवर तोडगा म्हणून पीक विमा योजनेतील पूर्वीचे नुकसान भरपाईचे निकष पूर्ववत सुरू करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

गेल्या काही वर्षांत अतिवृष्टी, अवेळी पाऊस आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपदांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत पीक विमा योजना ही शेतकऱ्यांसाठी मोठा आधार मानली जात होती. मात्र, विमा कंपन्यांचे नवनवीन नियम , ऑनलाइन अर्जातील अडचणी, तसेच अतिशय किचकट अटींमुळे प्रत्यक्ष नुकसान होऊनही अनेकदा भरपाईपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

काय आहेत शेतकऱ्यांच्या मुख्य तक्रारी?

नुकसान भरपाईचा दावा करण्यासाठी हवामान केंद्राची आकडेवारी आणि मर्यादित क्षेत्राचे निकष लावले जातात, ज्यामुळे प्रत्यक्ष शेतातील नुकसानाची योग्य




नोंद होत नाही.

नुकसान झाल्यापासून ७२ तासांच्या आत विमा कंपनीला ऑनलाइन किंवा ॲपद्वारे पूर्वसूचना देणे अनेक ग्रामीण भागातील नेटवर्कअभावी शक्य होत नाही.

एकाच गावातील काही शेतकऱ्यांना भरपाई मिळते, तर शेजारील शेतकरी त्यापासून वंचित राहतात.

यापूर्वी लागू असलेल्या पीक विमा योजनेतील पूर्वीची पद्धत अधिक शेतकरीधार्जिणी आणि पारदर्शक होती. त्यामध्ये पेरणी न होणे, मध्यंतरीचा प्रतिकूल हवामानाचा काळ, पीक काढणीच्या वेळी झालेले नुकसान आणि उत्पन्नावर आधारित घट अशा चारही टप्प्यांवर शेतकऱ्यांना संरक्षण मिळायचे. ही जुनी ट्रिगर पद्धत पुन्हा सुरू केल्यास शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने मदत मिळेल आणि त्यांचा योजनेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल, असा सूर शेतकरी संघटना आणि स्थानिक नेत्यांमधून उमटत आहे.

शासनाने यावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न घेतल्यास जिल्ह्यातील शेतकरी आगामी काळात आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत.

> 'विमा कंपन्या फक्त हप्ते जमा क रण्यात रस दाखवतात, पण नुकसान भरपाईची वेळ आली की नियमांचे बोट दाखवून शेतकऱ्यांना हुलकावणी देतात. सरकारने तत्काळ यात हस्तक्षेप करून जुने ट्रिगर नियम लागू करावेत.'
> — स्थानिक शेतकरी

**शेतकऱ्यांच्या माथी कुचकामी योजना :**

गेल्या खरिपापासून सरकारने राबविलेली योजना शेतकऱ्यांना योग्य भरपाई देण्यास असमर्थ ठरली आहे . त्यामुळे पीकविमा योजनेविषयी शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी वाढली आहे. पीक कापणी प्रयोगावर आधारित म्हणजेच उत्पादकता आधारित विमा योजनेतून नुकसान जास्त होऊन शेतकऱ्यांना भरपाई खूपच कमी मिळाली आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटात पीक नुकसान झाल्यानंतर योग्य भरपाईच्या माध्यमातून आधार हवा असतो.

निकष आणि पीक कापणी प्रयोगाच्या आधारे कृषी विमा कंपनीने केवळ मोजक्याच महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना भरपाई मंजूर केली. बहुतांश महसूल मंडळांमधील हजारो शेतकरी उत्पन्नाचे निकष पूर्ण न झाल्याने किंवा निकषांच्या मर्यादांमुळे पूर्ण भरपाईपासून वंचित राहिले आहेत.

# गुरुवर्य कै. माणिक यादव सातपुते (नाना) यांच्या प्रथम पुण्यस्मरण प्रित्यर्थ सातपुते परिवाराची सारोळा शाळेस १३००० /– रुपयांची वस्तुस्वरूपात मदत...!

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार** : आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा या ठिकाणी बुधवार,दिनांक २९ एप्रिल २०२६रोजी गुरुपौर्णिमाचे औचित्य साधत गुरुवर्य कै.माणिक यादव सातपुते (नाना) यांच्या प्रथम पुण्यस्मरण प्रित्यर्थ सातपुते परिवार यांच्या वतीने सारोळा शाळेस तेरा हजार (१३०००) रुपयांची वस्तू स्वरूपात मदत करून सामाजिक आदर्श निर्माण केला आहे.सातपुते गुरुजींनी दिलेले संस्कार,विचार,






शिकवण व स्मृती त्यांच्या जिवंत ठेवत सातपुते परिवाराने सारोळा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची सवय वृद्धिंगत करण्यासाठी १००००/- रूपये किंमतीची १०२ गोष्टीची पुस्तके तसेच ३०००/- रुपये किंमतीचा ऑफिस टेबल शाळेस भेट दिला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित असणारे सातपुते कुटुंबातील सदस्य अनुसया माणिक सातपुते,संभाजी भिमराव सातपुते,उषा संभाजी सातपुते यांचा शाळेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.तसेच समस्त सातपुते परिवाराचे शाळेच्या वतीने शतशः आभार व्यक्त करण्यात आले.

सदर कार्यक्रम प्रसंगी अनुसया सातपुते,संभाजी सातपुते,उषा सातपुते,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे, पालक सदस्य गणेश काशिद,अंगद चव्हाण व सागर काशिद,मुख्याध्यापक संदिप भालसिंग, पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे ,राहुल लिमकर , उपाध्यक प्रशांत होळकर,उपाध्यापिका शबाना शेख,वृषाली खांदवे व अमृता रसाळ मॅडम व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# माहूर पोलिसाकडून दंगा काबू नियंत्रण प्रत्यक्षीकांचे सादरीकरण

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी :सय्यद ईसा** : माहूर पोलिसाकडून आगामी सण उत्सव काळासाठी शांतता जातीय सलोखा कायम राहावा यासाठी दि 31 रोजी शहरातील अनेक चौकात दंगा काबू नियंत्रण प्रत्यक्षीक सादर करण्यात आले यावेळी पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचे सह पोलिसांनी या प्रत्यक्षीकात भाग घेतला विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास




चोपडे यांनी माहूर शहरासह तालुक्यात प्रत्येक ठिकाणी दंगा काबू नियंत्रण प्रत्यक्षीक सादर केले यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सादर केलेल्या प्रत्यक्षीक पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होतीमाहूर शहर हे सर्व धर्मियांचे पवित्र ठिकाण असून येथे यात्रा उत्सव मोठ्या प्रमाणात होत असतात तसेच शहरात अनेक वेळा मिरवणूकाही काढण्यात येतात आगामी सण उत्सवाचा निमित्ताने अनेक मिरवणुका निघणार आहेत या काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये शांतता राहावी नागरिकांनी कायद्याचे पालन करावे यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी शहरात अनेक ठिकाणी दंगा काबू नियंत्रण पथकासह प्रत्यक्षीक केले तसेच माहूर शहरासह तालुक्यात शांतता ठेवावी यासाठी पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी ठिकठिकाणी नागरिकांना जयंती उत्सव मंडळाच्या सदस्यांना आवाहन केले.

# आमखेडा–हाणवतखेड्यात आत्माच्या शेतीशाळेचा गजर

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशिम जिल्हा प्रतिनिधी** : आमखेडा/हानवतखेडा (ता. मालेगाव): महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत आत्मा (ATMA) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या महा विस्तार अभियान आणि फार्मर ग्रुप लीग स्पर्धेच्या अनुषंगाने आमखेडा व हाणवतखेडा येथे शेतीशाळेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी सहायक कृषी अधिकारी युवराज शिंदे यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती, नैसर्गिक शेती, पीक नियोजन, मृदा आरोग्य, संतुलित खत व्यवस्थापन, पाणी बचत, रोग व किड व्यवस्थापन तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांची सविस्तर माहिती दिली. शासनाच्या योजना प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवून शेती अधिक उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कृषी विभाग सातत्याने कार्यरत




असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या हवामानाचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मंडळ कृषी अधिकारी अमोल तांबे यांनी पीक व्यवस्थापन, हवामानानुसार शेतीचे नियोजन, फार्मर ग्रुपच्या माध्यमातून सामूहिक शेती विकास आणि कृषी विभागाच्या विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. उप कृषी अधिकारी रविंद्र मापारी यांनी शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया, अर्ज पद्धती तसेच कृषी विभागाकडून उपलब्ध सुविधांची माहिती दिली.

कार्यक्रमास प्रवेश तिवाले, हर्षलकुमार लबडे, महादेव तिवाले, प्रेमलता ताडके, स्वाती भगत यांच्यासह गावातील महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांनी शेतीशाळेच्या माध्यमातून आधुनिक शेतीविषयक उपयुक्त माहिती मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

आत्मा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अशा शेतीशाळा आणि फार्मर ग्रुप लीग स्पर्धा या शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती आणि सामूहिक शेती विकासाची दिशा देणाऱ्या ठरत असून, भविष्यातही अशा उपक्रमांचा अधिकाधिक लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन यावेळी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले.

# अडावद येथील नूतन प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील** : चोपडा तालुक्याती अडावद येथे नूतन प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नूतन ज्ञान मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य श्री पी डी चौधरी सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुरुवातीला श्री पी.डी .चौधरी सर ,इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या सेंड्रा मॅडम, उपप्राचार्य प्रकाश राणे सर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले .त्यानंतर विद्यालयातील लहान लहान बाल गोपालांनी उपस्थित सर्वच शिक्षक बंधू-भगिनींचे मनःपूर्वक गुरु पूजन केले. श्री पी डी चौधरी सर, सेंड्रा मॅडम, राणे सर सर तसेच उपस्थित सर्व शिक्षक शिक्षिका बंधू-भगिनींनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची कामना केली.

सदर प्रसंगी श्री पी डी चौधरी सरांनी गुरु पौर्णिमेचे महत्त्व आपल्या मनोगतातून विषद केले.

" गुरूब्रम्हा गुरर्विष्णु, गुरुदेवो महेश्वर:
गुरू साक्षात परब्रम्हः, तस्मै श्री गुरूवेय नम:"

'गुरूपौर्णिमा' हा भारतातील एक महत्त्वाचा सण आहे. आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला गुरूपौर्णिमा साजरी केली जाते. भारतात प्राचीन काळापासून गुरु शिष्य परंपरा आहे. भारतीय संस्कृतीत गुरूला देवाप्रमाणे मानले जाते. म्हणूनच गुरूपौर्णिमेला गुरूपूजनदेखील केले जाते.

गुरूपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असंही म्हणतात. कारण महर्षी व्यासांनी वेदांचे ज्ञान जगासमोर उघड केले. व्यासांना भारतीय संस्कृतीमध्ये आद्यगुरू समजले जाते. व्यासांनी महाभारत हा अलौकिक ग्रंथ लिहीला.गुरूपौर्णिमेला व्यासपूजन देखील केले जाते. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुंबद्दल आदराची भावना आपल्या हृदयात जपावी असा मौलिक सल्ला श्री पी डी चौधरी सरांनी विद्यार्थ्यांना दिलाकार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# मनोजवम फाउंडेशनकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर HHO हायड्रोजन कुकिंग तंत्रज्ञानाचे सादरीकरण

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर(दि.०१) आषाढी एकादशी निमीत्त दि.२४ ऑक्टोबर २०२६ रोजी पंढरपूर येथे आयोजित विशेष कार्यक्रमामध्ये मनोजवम फाउंडेशनने स्वदेशी HHO (Hydrogen-Oxygen) Cooking Technology या अभिनव स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाचे सादरीकरण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मा.कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे,मा. कॅबिनेट मंत्री गिरीशजी महाजन तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या उपस्थितीत केले.

या प्रसंगी मनोजवम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO विनायक पाटील यांनी या तंत्रज्ञानामागील संकल्पना, कार्यपद्धती आणि देशासाठी असलेले महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली.त्यांनी सांगितले की,पाणी आणि वीज यांच्या सहाय्याने हायड्रोजन व ऑक्सिजन वायू तयार करून त्यापासून स्वच्छ ज्वाला (Flame)निर्माण केली जाते.या ज्वालेचा वापर स्वयंपाकासाठी सुरक्षित आणि प्रभावी पद्धतीने करता येतो.



यावेळी देगलूर तालुक्यातील मौजे खुतमापूर येथील विनायक विद्याधर पाटील यांनी आपल्या सादरीकरणात नमूद केले की, अलीकडील जागतिक संघर्षांमुळे आणि पुरवठा साखळीतील अडचणींमुळे LPG सिलिंडरच्या उपलब्धतेवर परिणाम झाल्याचे अनुभवास आले. अशा परिस्थितीत भारताने स्वच्छ आणि स्वदेशी ऊर्जा उपायांकडे वाटचाल करणे आवश्यक आहे.HHO कुकिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पाणी आणि वीज यांचा वापर करून स्वयंपूर्ण इंधन तयार करता येत असल्याने,परदेशी इंधनावरील अवलंबित्व कमी करून ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यास मदत होऊ शकते असेही यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी पाणी आणि वीज यांच्या साहाय्याने आवश्यकतेनुसार ९९.९९% शुद्ध हायड्रोजन निर्मिती.धूररहित (Smokeless) आणि कार्बनमुक्त (Carbon-Free) स्वयंपाक,पारंपरिक LPG वरील अवलंबित्व कमी करण्याची क्षमता,घरगुती स्वयंपाकघर, सामुदायिक स्वयंपाकगृह, आश्रमशाळा,वसतिगृहे,मंदिरे आणि संस्थात्मक स्वयंपाकासाठी उपयुक्त तंत्रज्ञान,घरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करणारी स्वच्छ ऊर्जा प्रणाली,

सुरक्षित,कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक स्वयंपाकाची संकल्पना सादर केली.या सादरीकरणानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोजवम फाउंडेशनच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करून भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.राज्यात स्वच्छ ऊर्जा आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासासाठी अशा नवकल्पना महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी नमूद केले.मनोजवम फाउंडेशनच्या या उपक्रमामध्ये संचालक सौ. सुप्रिया पाटील आणि शिवाजी जाधव यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.संस्थेची संपूर्ण टीम ग्रामीण आणि शहरी भागात स्वच्छ ऊर्जा,शाश्वत विकास आणि तंत्रज्ञानावर आधारित सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्यरत आहे.

या उपक्रमाचा पुढील टप्पा म्हणून १५ ऑगस्टपर्यंत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक (SP) कार्यालयामध्ये व्यावसायिक क्षमतेचा HHO हायड्रोजन कुकिंग स्टोव्ह उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रणालीद्वारे दररोज सुमारे २०० व्यक्तींसाठी स्वयंपाक करण्याची क्षमता उपलब्ध होणार असून, सामुदायिक स्वयंपाकगृहांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक ऊर्जा उपाय उपलब्ध करून देण्याचा हा एक महत्त्वाचा प्रयत्न असेल. मनोजवम फाउंडेशनचा विश्वास आहे की,स्वदेशी संशोधन,नवकल्पना आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करू शकतो.HHO कुकिंग तंत्रज्ञान हे स्वच्छ ऊर्जा,पर्यावरण संरक्षण आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते. तसेच,भविष्यात घरगुती,संस्थात्मक आणि सामुदायिक स्वयंपाकासाठी पर्यावरणपूरक पर्याय म्हणून या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

# आर्णीत अतिवृष्टीने हाहाकार: पूरग्रस्त नागरिकांच्या तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून शासनाने मदत द्यावी – नगरसेवक अमोलभाऊ मांगुळकर आर्णी

**दैनिक युवक आधार**

**आर्णी तालुका प्रतिनिधी-मुरली राठोड :** आर्णी शहरात झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे संपूर्ण परिसरात हाहाकार उडाला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरात निर्माण झालेल्या या भीषण पूरस्थितीमुळे नागरिकांचे अतोनात नुकसान झाले असून, प्रशासनाने तातडीने दखल घेऊन नुकसानीचे पंचनामे करावेत आणि पूरग्रस्त नागरिकांना त्वरीत आर्थिक मदत द्यावी, अशी आक्रमक मागणी नगर परिषदेचे नगरसेवक तथा गटनेते अमोल सुधाकर मांगुळकर यांनी केली आहे.

**प्रभागात शिरले पुराचे पाणी**

मिळालेल्या माहितीनुसार, आर्णी शहरात अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यांना पूर आला असून, प्रभाग क्रमांक १० मधील उदयनगर, भाजी मंडई परिसर तसेच नदीकाठालगतच्या वस्त्यांमध्ये पुराचे पाणी थेट नागरिकांच्या घरांमध्ये शिरले. अचानक आलेल्या या लोंढ्यामुळे नागरिकांना सावध होण्याची संधीही मिळाली नाही, परिणामी घरातील साहित्याचे अतोनात नुकसान झाले आहे.

मोठे आर्थिक व मालमत्तेचे नुकसान पुराच्या या तांडवामुळे प्रभागातील घरांचे, घरातील अन्नधान्याचे, मौल्यवान फर्निचरचे, विद्युत उपकरणांचे तसेच परिसरातील व्यापारी प्रतिष्ठानांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबांसमोर राहण्याचा व खाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून, पूरग्रस्तांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

**प्रशासनावर कायदेशीर जबाबदारी**

या गंभीर परिस्थितीबाबत बोलताना अमोल मांगुळकर यांनी प्रशासनाला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ ची आठवण करून दिली आहे. या अधिनियमांतर्गत जिल्हा प्रशासनावर आपत्तीग्रस्त भागाची तात्काळ पाहणी करणे, नुकसानाचे पंचनामे करणे, मदत व पुनर्वसनाची कार्यवाही करणे तसेच पात्र नागरिकांना तातडीने आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची कायदेशीर जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**अमोल मांगुळकर यांच्या प्रमुख मागण्या:**

तातडीने पंचनामे: प्रभाग क्र. १० मधील सर्व पूरग्रस्त भागांचे महसूल विभागामार्फत तात्काळ पंचनामे करण्यात यावेत.

आर्थिक भरपाई: शासनाच्या विद्यमान नियममानुसार पात्र पूरग्रस्त नागरिकांना तात्काळ आर्थिक मदत व नुकसानभरपाई मंजूर करण्यात यावी.

विशेष पुनर्वसन: ज्या कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, अशा कुटुंबांना विशेष आर्थिक सहाय्य व पुनर्वसनाचा लाभ देण्यात यावा.

आरोग्य व स्वच्छता उपाययोजना: पूरग्रस्त भागात तातडीने स्वच्छता मोहीम राबवून जंतुनाशकीकरण करण्यात यावे. तसेच नागरिकांसाठी आरोग्य शिबिरे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व इतर आवश्यक उपाययोजना तात्काळ राबवल्या जाव्यात.कायमस्वरूपी उपाय: भविष्यात अशा प्रकारची पूरस्थिती पुन्हा उद्भवू नये, यासाठी नदीकाठच्या परिसरात कायमस्वरूपी पूरप्रतिबंधक उपाययोजना राबवाव्यात, तसेच नाल्यांचे सक्षमीकरण व जलनिस्सारण व्यवस्थेची तातडीने सुधारणा करावी.प्रशासन आणि शासन स्तरावरून पूरग्रस्तांना लवकरात लवकर दिलासा मिळाला नाही, तर नागरिकांच्या सोबत तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी नगरसेवक अमोल मांगुळकर यांनी दिला आहे.

# घोरपड शिकारीची सलग दुसरी घटना; वन विभागाच्या उदासीनतेने घोरपडीचा गेला जीव

## फॉरेस्ट डिपार्टमेंट की 'डिपार्टमेंट फॉर रेस्ट'? डॉ. पाटील यांची वन विभागावर संतप्त खंत

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : काही दिवसांपूर्वी सिल्लोड तालुक्यात घोरपड या वन्यजीवास शिकारीच्या तावडीतून वाचवण्यात यश आल्याची घटना ताजी असतानाच, काल पुन्हा तालुक्यातील हट्टी येथील बाजारामध्ये सासुरवाडा येथील एक शिकारी घोरपडीस पकडून विक्रीसाठी उभा होता. सदर बाब निसर्गप्रेमी असलेले व डॉ. संतोष पाटील यांचे सहकारी, बहुली येथील भाऊसाहेब निकोत यांच्या निदर्शनास आली. त्यांनी सदर व्यक्तीकडे पिशवीमध्ये काय विक्रीस आहे याची खातरजमा करत पिशवी उघडून पाहिली असता, त्यांना त्यात मोठी जिवंत घोरपड आढळली. थोडे बाजूला होऊन त्यांनी ही बाब फोन करून डॉ. पाटील यांना कळवली.

पाटील यांनी निकोत यांना सूचना केली की, "आम्ही येईपर्यंत या व्यक्तीवर लक्ष ठेवा व त्याची रक्कम ठरवून तीस मिनिटे त्यास झुलवत ठेवा." ठरल्याप्रमाणे १ हजार ३०० रुपयांमध्ये घोरपडीचा सौदा ठरला.

घटना अजिंठा प्रादेशिक वन क्षेत्रात येत असल्याने, पाटील यांनी क्षणाचाही विलंब न लावता संबंधित वनपाल तरटे मॅडम यांना दोन वेळा फोन केला, मात्र त्यांनी फोन स्वीकारला नाही. म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांना संपर्क केला, मात्र त्यांनीही फोन घेतला नाही. नाईलाजाने उपमुख्य वनसंरक्षक सुवर्णा माने यांना कळवण्यासाठी दोन वेळा फोन केला, मात्र माने यांनीही फोन स्वीकारला नाही. लगेच मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक यांना ही बाब कळवली. पाठक यांनीही सुवर्णा माने यांना दोन वेळा संपर्क केला, मात्र त्यांचाही फोन स्वीकारला गेला नाही. पुन्हा पाटील यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी दोडके यांना कॉल केला असता, दोडके यांनी कॉल स्वीकारला आणि वनपाल व संबंधित वनरक्षक यांना मदतीस पाठवतो असे सांगितले. डॉ. पाटील भर पावसात एका मित्राची मोटरसायकल घेऊन निघण्यास तयार होते, मात्र एक तास झाला तरी कोणत्याही वन कर्मचाऱ्याने सोबत येण्यास सहायता दाखवली नाही. घोरपड हा 'शेड्यूल वन' (वन्यजीव संरक्षण कायदा १९७२) अंतर्गत अत्यंत संरक्षित वन्यजीव असल्याने, कारवाईसाठी वनविभागाचा कर्मचारी सोबत असणे कायदेशीरदृष्ट्या गरजेचे होते. शेवटी सात वाजता सदर घोरपड हट्टी येथील एका व्यक्तीने दीड हजार रुपयात खरेदी केली आणि वन विभागाच्या कायदेशीर उत्तरदायित्वातील हलगर्जीपणामुळे एक महत्त्वपूर्ण वन्यजीव निसर्गातून कायमचा नष्ट झाला.

**लाचलुचपतची अफवा आणि वन विभागाची अक्षम्य अनास्था!**

ज्या दिवशी ही घटना घडली, त्याच दिवशी संध्याकाळी सिल्लोड - सोयगाव व न विभागाचा एक कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्याची अफवा तीव्रतेने पसरली होती. या भीतीपोटी किंवा धास्तीमुळे एकाही जबाबदार कर्मचाऱ्याने नागरिकांचे फोन स्वीकारण्याचे धाडस केले नाही, असे नंतर स्पष्ट झाले. एका निराधार अफवेमुळे आणि वन प्रशासनाच्या एकूणच उदासीन कारभाराने एक वन्यजीव वाचवण्याची सुवर्णसंधी हुकली. वन्यजीवांच्या रक्षणाची ज्यांच्यावर कायदेशीर जबाबदारी आहे, ते अधिकारीच जर संकटाच्या वेळी गायब राहत असतील, तर 'फॉरेस्ट डिपार्टमेंट हे 'डिपार्टमेंट फॉर रेस्ट' (विश्रांतीचे ठिकाण) झाले आहे का?' अशी संतप्त व कायदेशीर बोचरी खंत निसर्गप्रेमी डॉ. संतोष पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# निफाड तालुका क्रीडाशिक्षकांचा शासकीय क्रीडा स्पर्धांवर बहिष्कार क्रीडाशिक्षक भरती तातडीने करण्याची मागणी; विविध मागण्यांचे निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : शारीरिक शिक्षण विषयातील शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात तसेच प्राथमिक शाळांमध्ये क्रीडाशिक्षकांच्या रिक्त पदांची भरती तातडीने करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी निफाड तालुका क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेने शासकीय क्रीडा स्पर्धांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.



निफाड येथे आयोजित तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेदरम्यान क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना, युवा शारीरिक शिक्षण संघटना तसेच क्रीडा मार्गदर्शकांनी स्पर्धेवर बहिष्कार नोंदवत शासनाचे लक्ष वेधले. शारीरिक शिक्षण विषयात बी.पी.एड. शिक्षण पूर्ण केलेले अनेक युवक भरतीच्या प्रतीक्षेत असून, प्राथमिक शाळांसाठी केंद्रस्तरावर ४,८६८ क्रीडाशिक्षकांची पदे निर्माण करण्यात आली असली तरी भरती प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे क्रीडाशिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनात नाशिक जिल्ह्यात तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये क्रीडाशिक्षकांची मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याचे नमूद केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक शाळेत प्रशिक्षित क्रीडाशिक्षक असणे आवश्यक असून शासनाने भरती प्रक्रिया तातडीने सुरू करून शारीरिक शिक्षण विषयाला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण, राजेंद्र सोमवंशी, निफाड तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष विलास निरभवणे, युवा तालुका शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष गणेश ढोकळे, सचिव चेतन कुंदे, जिल्हा संघटक अविनाश वाघ, विलास गायकवाड, साहिल शेख, गणेश पवार तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी निफाड तालुका केंद्रप्रमुख गोविंद कांदळकर आणि तालुका क्रीडा अधिकारी श्री. शरद बोडके यांना निवेदन सादर केले.

**प्रमुख मागण्या :**

जिल्हा परिषद केंद्रस्तरीय ४,८६८ क्रीडाशिक्षकांच्या सेवाप्रवेश नियमावलीची तात्काळ घोषणा करून भरती प्रक्रिया सुरू करावी.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार क्रीडाशिक्षकांच्या पदांवर इतर विषयांच्या शिक्षकांचे समायोजन न करता ती पदे पवित्र पोर्टलद्वारे भरावीत.

२ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार मंजूर झालेली सर्व पदे २०२५ भरतीच्या पहिल्या टप्प्यात शंभर टक्के पवित्र पोर्टलद्वारे भरावीत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये क्रीडाशिक्षकांची नियमित भरती तातडीने करण्यात यावी.

संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, शासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर यापुढील शासकीय क्रीडा स्पर्धांवर बहिष्कार कायम ठेवत राज्यव्यापी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

# सणसरच्या भाच्याची राज्यस्तरीय मानाची निवड; माण तालुकाध्यक्षपदी पै.विराज राजेमाने

**दैनिक युवक आधार**

**सणसर: विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथील श्री.वैभव उर्फ संजय वसंतराव शिंदे यांचे भाचे पै.विराज राजेमाने यांची महाराष्ट्र राज्य कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या वतीने माण तालुकाध्यक्ष (जि.सातारा) या महत्त्वाच्या पदावर फेरनिवड झाल्याने सणसर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कुस्ती,मल्लविद्या आणि पारंपरिक भारतीय क्रीडा संस्कृतीचे जतन,संवर्धन व प्रसारासाठी पै.राजेमाने यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत महासंघाने त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त केला आहे. समाजाशी असलेली घट्ट नाळ,उत्कृष्ट संघटन कौशल्य आणि कुस्तीप्रेमींसाठी असलेले समर्पण यामुळे त्यांची या पदावर फेरनिवड करण्यात आली.



त्यांच्या नेतृत्वाखाली माण तालुक्यातील कुस्ती चळवळीला नवी दिशा मिळेल,ग्रामीण भागातील होतकरू मल्लांना प्रोत्साहन मिळेल,आखाडा संस्कृती अधिक बळकट होईल तसेच विविध कुस्ती स्पर्धांद्वारे पारंपरिक मल्लविद्येला नवी उभारी मिळेल,असा विश्वास कुस्तीप्रेमींनी व्यक्त केला आहे.या निवडीमुळे महाराष्ट्रातील कुस्ती परंपरेचा गौरव अधिक उंचावण्यास हातभार लागेल,अशी अपेक्षा व्यक्त होत असून सणसर परिसरातून पै.विराज राजेमाने यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत असून महाराष्ट्र राज्य कुस्ती मल्लविद्या महासंघानेही त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.